साप्ताहिक प्राजक्त

वर्ष :४५ अंक : १०० फोन ०२३१-२५४०४२७
कोल्हापूर ता. २३ जानेवारी २०१७ किंमत दोन रुपये
Reg. No. KLR 136/15-17 Posted in Kolhapur RMS

अंक तिसावा
जानेवारी २०१७

आम्ही भिडे

# नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

मुखपत्र (खाजगी वितरण)



नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
संस्था नोंदणी क्रमांक
ई-२०१४० मुंबई

• पुणे कार्यालय •
ले. क. सुनिल वासुदेव भिडे
१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०
मो. ९६२३०१७४४४/९६५७५४१२३६
• मुंबई कार्यालय •
सौ. संपदा भिडे
ए-५०३, श्री साई शारदा हौसिंग सोसायटी,
भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई ४०००२८.
मो. ९८१९९५१३९१
e-mail : office@bhidekul.in
webdite : www.bhidekul.in



नित्युंदन ऋषी

संपादकीय -

गतवर्षीच्या नाशिक संमेलनाला पाहता पाहता एक वर्ष पूर्ण झाले. आज दि. २२ रोजी 'आम्ही भिडे' ३० व्या अंकाचे प्रकाशन होत आहे. ह्या संमेलनाचे निमित्ताने उपस्थित मान्यवरांचे आणि सर्व सुजाण सभासदांचे आभार.

आजमितीला प्रतिष्ठानच्या छोट्याशा रोपट्याचा वटवृक्ष होऊ पाहतोय ही बाब निश्चितच गौरवास्पद आहे. कोणतीही संस्था सुरू करणे जितके अवघड असते, परंतु ती अनेक वर्षे यशस्वीपणे चालविणे हे अतिशय खडतर असते. प्रतिष्ठानकडून अडचणीत असलेल्यांना वैद्यकीय मदत, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी/विद्यार्थिनींना आणि विशेषतः आर्थिक अडचणीत असलेल्यांना मदत करणे इत्यादी माध्यमांतून भिडे कुलोत्पन्नांची गरज भागविणे ही आपली गुर्मी नव्हे तर ह्या भावनेच्या ऊर्मीने प्रतिष्ठानचे ज्येष्ठ आणि तरुण कार्यकर्ते, पदाधिकारी, विश्वस्त आणि सर्व सभासद, हितचिंतक इतकी वर्षे सेवा करीत आहेत. त्याबद्दल मी सर्वांचे हार्दिक अभिनंदन करतो.

खरंतर एका संमेलनाची सांगता होत असतानाच पुढील वर्षीच्या संमेलनासाठी, नव्या उत्साहाने श्री. अनिलराव, विजयसिंहजी, श्यामराव, अॅड. अविनाश, अरुणराव, आदित्य व प्रशांत, डॉ. मोरेश्वर ह्यांसारखी भिडे मंडळी स्वतःहून संमेलन घेण्यासाठी उत्सुक असतात ही गोष्ट प्रशंसनीय आहे. १५ वर्षे प्रतिष्ठान जतन केलेल्या विश्वस्तांनी नवीन विश्वस्तांना वाव देण्याचे संकेत देऊन निवृत्तीचा निर्देश दिला. म्हणून नियंत्रक समितीने २०१५ पासून ज्येष्ठ मार्गदर्शन आणि तरुण मंडळींची विश्वस्त पदावर समतोल राखून नेमणूक केली आहे. त्याप्रमाणे सर्व अकरा विश्वस्त आपापले काम चोखपणे करीत आहेत ह्याबद्दल कोणाचे दुमत नाही.

दरवर्षी संमेलन घ्यायचे म्हणजे एक मंगलकार्यासारखे असते. संमेलनाव्यतिरिक्त वर्षातून अनेक वेळा प्रत्यक्ष संवाद होण्याचे दृष्टीने रक्षाबंधन, गणेशोत्सव, नवरात्र किंवा अन्य कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आपल्या संकल्पना संमेलनाच्या शेवटच्या सत्रात जरूर सांगाव्यात. आजमितीला प्रतिष्ठानला २० वर्षे पूर्ण होत आली, परंतु पुणे, मुंबई ह्यांसारख्या शहरांमध्ये छोटीशी का होईना परंतु स्वतःची वास्तू होणे अपेक्षित आहे. इतर छोट्या कुलांच्या सुद्धा स्वतःच्या जागा आहेत, परंतु भिडे कुलाची स्वतःची वास्तू नाही ह्याबद्दल खंत वाटते. कार्यालयीन वास्तू असेल तर कामामध्ये अधिक एकसंघता आणि नियमितपणा येईल. सद्य परिस्थितीत आम्ही हे सर्व कामकाज कार्यालयाविनाच सांभाळत आहोत. त्यामुळे ह्याचा आता विचार लवकर करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्या विचारांची आणि सहकार्याची अपेक्षा आहे.

**सर्व जाहिरातदार, बॅनर्स, देणगीदार, आश्रयदाते व हितचिंतकांचे प्रतिष्ठान मनःपूर्वक आभारी आहे !**

आम्ही भिडे अंक ३० वा

संपादक : **श्री. शशिकुमार केशव भिडे**
कार्यकारी संपादक : **श्री. दिलीप भिडे**

| संपादक मंडळ : | सल्लागार मंडळ : |
|---|---|
| श्री. प्रभाकर भिडे | श्री. सुनील भिडे (अभिरुची) |
| ले.क. सुनील भिडे | श्री. के. मो. भिडे |
| श्री. चिंतामणी भिडे | शशिताई घुले |
| सौ. स्नेहल भिडे | डॉ. प्रतिभा भिडे |
| सौ. प्रिती भिडे | श्रीमती सुमती भिडे |
| श्री. विनायक भिडे | अक्षर जुळणी : सौ. विनीता डबीर |

**सहवेदना :** भिडे कुलातील ज्ञात व अज्ञात भिडे व्यक्तींचे निधन झाले त्यांना भिडे प्रतिष्ठान श्रद्धा सुमने अर्पण करीत आहे.
श्री. गजानन सदाशिव भिडे, दादर. सौ. विद्या शंकर भिडे, पुणे. श्री. विश्वनाथ शंकर भिडे, पुणे. श्री. प्रभाकर रामचंद्र भिडे, सांगली. श्री. अशोक भिडे, डोंबिवली. श्रीमती सुधा दत्तात्रय भिडे, अंमळनेर

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान**

९२, शुक्रवार पेठ येथील कार्यालय तात्पुरते बंद आहे. त्याठिकाणी पत्रव्यव्हार करु नये. त्या ऐवजी पत्रव्यव्हारासाठी पत्ता या ठिकाणी संपर्क/पत्रव्यव्हार करावा, ही नम्र विनंती आहे.

पत्रव्यव्हारासाठी पत्ता
**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**
१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०
मो. ९६२३०१७४४४

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| गोव्याची ओळख | ३ |
| भिडे प्रतिष्ठानची स्वतःची वास्तू | ७ |
| देणगीदार | ७ |
| विद्यार्थी गुणगौरव | ९ |
| प्रतिष्ठानचे पुरस्कार | ११ |
| कविता | १५ |
| ऋषितुल्य दादा ! | १६ |
| हार्दिक शुभेच्छा : सौ. प्रिया भिडे | १९ |
| मॅरेथॉन : एक अविस्मरणीय अनुभव | २१ |
| नैसर्गिक औषधे : काळाची गरज | २२ |
| भावपूर्ण श्रध्दांजली ! | २३ |
| सहवेदना | २५ |
| माझी पहिली इनिंग ! | २७ |
| भरारी | २९ |
| ब्रिज या खेळाची माहिती | ३३ |
| सामर्थ्य आहे चळवळीचे....! | ३४ |
| कविता | ३५ |
| ऋषितुल्य ! | ३८ |
| श्री ब्रह्मचैतन्य - गोंदवलेकर महाराज | ४० |
| नाडण भिडे कुल वार्षिक संमेलन | ४२ |

## विनम्र आवाहन

आम्ही भिडेच्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधत आहोत. आम्ही करीत असलेल्या प्रयत्नांना आपल्या सहकार्याची जोड अपेक्षित आहे. 'आम्ही भिडे' मुखपत्रासाठी छोटे माहितीपूर्ण लेख, कविता, उल्लेखनीय कार्य, पुरस्कार, सन्मान, कुटुंबातील जन्म-मृत्यू इत्यादींबाबत माहिती प्रतिष्ठानच्या ठाणे/पुणे कार्यालयात पाठवावी. हा अंक बहुतांशी जाहिरातींवरच अवलंबून असल्यामुळे आपण करीत असलेल्या उद्योग, व्यवसायाची जाहिरात प्रसिद्धीसाठी द्यावी. संपर्कासाठी बदललेले व अचूक पत्ते, ई-मेल तसेच आपल्या परदेशस्थ नातेवाईकांचे ई-मेल्स, पत्ते पाठवावेत. भिडे माहेरवाशिणींनी पत्ते आवर्जून पाठवावेत. 'आम्ही भिडे' अंकाचे वितरण विनामूल्य आहे, तरीसुद्धा जाहिरात आणि देणगीच्या स्वरूपात आर्थिक हातभार लावावा.

# गोव्याची ओळख

– सौ. अंजली माधव भिडे
रायबंदर, गोवा.
मो. ९४२१२४६३९२

भारताच्या नकाशावर आपले बिंदूस्वरूप अस्तित्व मिरविणारा गोवा हा सुप्रसिद्ध प्रदेश. निळा सागर, आकाशाला भिडणारे डोंगर, जंगले, शेते–माडे, पोफळी, काजू, आंबे, फणस यांची दाटी, मंदिरे, चर्चेस, मुसळधार पाऊस, वैशिष्ट्यपूर्ण सण आणि उत्सव, शांतताप्रिय लोक यांचा सौंदर्यपूर्ण मिलाफ म्हणजे गोवा. देवभूमी अशी ओळख मिरविणारा हा प्रदेश निसर्गतेला देवत्व भजतो. निसर्गाने गोव्याला भरभरून दिलंय. पण हे वैभव टिकविण्यासाठी पूर्वजांनी श्रद्धा, पूजा, भक्ती, सण आणि उत्सव यांची योग्य सांगड घालून पोषक रचना केलेली आहे. इथली मुख्य देवता श्री सातेरी देवी. हीचे मूळ स्वरूप हे 'वारूळ' आहे. भूमीतून वर आलेली म्हणून तिची देवी भूमिका अशी ओळख आहे. प्रत्येक गावात सातेरी वा भूमिका देवीचं देऊळ आहे. देवाच्या नावानं सांभाळून ठेवलेला जंगलाचा राखीव भाग म्हणजे 'देवराय' हे जंगल संवर्धनाचं प्राचीन रूप आहे. गावातच लोकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी गावागावात पारंपरिक लोककला आणि उत्सवांसाठी राखीव जागा म्हणजे 'मांड'ची व्यवस्था आहे. याला गावचं 'थिएटर' म्हणता येईल. जत्रेला होणारा दिवजोत्सव (दिव्यांचा उत्सव) म्हणजे मातीचं पूजन. चार बाजूला चार पणत्या आणि मध्ये एक पणती, खाली बैठक अशा आकाराचं मातीचं हे दिवज गोव्याचं प्रतीक आहे. त्याचप्रमाणे मातीपासून बनलेलं आकारानं गोल असलेलं घुमट हे वाद्य मूळ गोव्याच्या आदिवासींचं लोकवाद्य. इथला शिगमा, आरत्या, मांडी, देखणी सगळे प्रकार त्याच्या 'धी थी थै धीईच्या यै' या तालावर दंग होऊन जातात. पारंपरिक लोकगीतांतून निसर्ग पूजनाची परंपरा पुढे नेताना इथल्या उत्सवांमधली गीते देवदेवता, वनदेवता आणि धर्तरीमाय यांना समर्पित असतात !



चतुर्थी हा इथला सगळ्यात मोठ्ठा सण. घराघरात गणपतीचं पूजन करतात. गणपतीसमोर बांबूच्या चौकोनावर बांधलेली जंगली फळं, फुलं, आंब्याच्या डहाळ्या यांची माटोळी हे ही जंगल पूजेचं प्रतीक. गणपतीच्या मूर्तीबरोबरच माटोळीची आरास कौतुकाने पाहिली जाते. घुमट–आरती हा आरती गाण्याचा निराळा प्रकार गोव्यात पाहायला मिळतो. गावागावांत महिनाभर आधी चालेल्या घुमट आरतींच्या तालमींनी सगळ्यांना चतुर्थीचे वेध लागतात. चतुर्थीला लवलेला फोग (फटाके व आतषबाजी) पाहिला की हौसेला मोल नसतं हे यावेळी अनुभवायला मिळतं. दिवाळीला आदल्या रात्री ठिकठिकाणी नरकासुराच्या प्रतिमा उभारून पहाटेला दहन केलं जातं. प्रमुख शहरात नरकासुर स्पर्धांचं आयोजन केलं जातं. या देवभूमीत प्रत्येक देवळाची जत्रा–काला गावच्या खास वैशिष्ट्यांसह साजरी होते. पालखी, नौकाविहार, कौल, प्रसाद असे कार्यक्रम असतात. जत्रा आणि नाटक याचं घट्ट नातं आहे. देवळाच्या उत्सवाला गावचे लोक नाटक बसवतात. या नाटकात काम करणं ही अभिमानाची गोष्ट असते. अशाच जत्रांमधून गोव्यातल्या डोंगरी या कृष्णभट बांदकर यांनी लिहिलेल्या संगीत नाटकाचं सादरीकरण पाहून अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी १८८० साली संगीत शाकुंतल हे नाटक रंगमंचावर आणलं. संगीत क्षेत्रातील नामवंत मंडळींच्या नावे इथे

आदरणीय

कै. मुरलीधर पंढरीनाथ घुले

यांच्या स्मृतीस अभिवादन करुन

समस्त घुले परिवाराकडून

‘आम्ही भिडे’ अंकास

# हार्दिक शुभेच्छा

श्रीमती शशी मुरलीधर घुले (भिडे)

श्री. मुकुल मुरलीधर घुले

श्री. गुणेश मुकुल घुले

श्री. सिद्धार्थ मुकुल घुले

श्री. महेंद्र मुरलीधर घुले



सौ. गायत्री मुकुल घुले

सौ. प्रणाली गुणेश घुले

सौ. मैथिली सिद्धार्थ घुले

सौ. प्राची महेंद्र घुले

सौ. सुनिता महेंद्र घुले

चि. अंगद महेंद्र घुले

चि. आदित्य महेंद्र घुले

(पान ३ वरुन) दरवर्षी नाट्यमहोत्सव, संगीत महोत्सव साजरे केले जातात.

गोव्यातल्या देवळांची रचना, तिथली शांतता, शुचिता केवळ अवर्णनीय ! भक्तिसागरात नहालेला गोवा पाहायला कोणत्याही देवळात जा. आठवड्यातून एक दिवस तरी सार्वजनिक भजन असतंच. श्रावण महिना, नवरात्र, देवळातले उत्सव म्हणजे भजन, कीर्तन आणि प्रवचन आलंच. गणपतीलाही घरोघरी खास भजन आणि सत्यनारायण पूजेलाही भजन. गोव्याची शेकडो वर्षांची भक्ती परंपरा सांगणारे पेडणे, वास्को आणि पणजी येथील सप्ताह, मडगांवची दिंडी ही काही महत्त्वाची उदाहरणे आहेत. यावेळी देशातील नामांकित गायक ठरलेल्या ठिकाणी पालखीसमोर संगीत बैठक रंगवतात. पेणे, भजन, आरती, गायन अशी रेलचेल असते.

या एवढ्याशा गोव्याची सांस्कृतिक श्रीमंती कुबेरालाही लाजवेल अशीच आहे. इथे निसर्गाशी जवळीक आणि समाजात एकोपा नांदविणारे पन्नास लोककला प्रकार आहेत. पुराणातल्या कथा, रामायण, महाभारत आदी सगळ्या ग्रंथांचा संदर्भ इथल्या लोककलेशी जुळलेला आहे. 'रणमाले' या नाट्य प्रकारात रामायण, गुड्डुल्यां परबला रात्र जागवताची भिमाची गाणी, काला, शिमग्यातली पौराणिक नाटकं.

साहित्य क्षेत्रातही याच आधारावर देवांची चरित्रे, गौळणी, आर्या, भूपाळी, नाटकं असं वेगवेगळं साहित्य निर्माण झालं. पण यात विशेष ते काय ? ही तर आपली परंपराच. पण पोर्तुगीज राजवटीत इथली प्राचीन संस्कृती नष्ट करण्यासाठी देवळे उद्ध्वस्त केली, ग्रंथ नष्ट केले. हिंदूंचे रितीरिवाज व वेषभूषेवर बंदी आणली. सण-उत्सवांवर बंधने लादली. या पार्श्वभूमीवर पूर्वजांनी दिलेलं संचित जपणं किती कठीण झालं असेल याची कल्पनाच करणं कठीण होतं.

काही वर्षांपूर्वी इथल्या गावात गेल्यावर टुमदार कौलारू घर पाहायला मिळायची. पण लवकरच हे चित्र पालटले. हल्ली बहुतेक घरांना सिमेंटचं छत घालतात. दारात अंगण, तुळशी वृंदावन आणि 'पोरसू' (बाग) हवंच. पोरसू म्हणजे घरातल्या गृहिणीचे जणू दुसरं अपत्यच. एक-दोन केळीची झाडं, पपई, मिरचीची रोपे, अबोली, शेवंती, झेंडू असं सारं त्या जागेत सामावलेलं असतं. पावसाळ्यात काकडी, घोसाळी, दुधीचे वेल छपरावरून लोंबताना दिसतात. गावकरी परंपरागत सण, उत्सव एकत्रपणे साजरे करतात. कुणाचं लग्न असलं की सगळेजण मांडव उभारणीपासून लग्नाचं जेवण बनविण्यापर्यंत सारा भार स्वेच्छेने स्वीकारतात. नवरीला सासरच्या घरापर्यंत पोचवायला गाव लोटतो.

इथल्या ख्रिश्चन समाजाने आपलं वेगळेपण जपलंय पण तेही या मातीशी इमान राखत. पाश्चात्यांच्या संस्कृती अंगीकारलेल्या या समाजाचे सण-उत्सव वेगळे, तरीही इथल्या मातीकडे नातं सांगणारे. त्यांच्या देखणी या नृत्यप्रकारात गोव्याची लोककला आणि पाश्चात्य संगीताची सरमिसळ पाहायला मिळते. चर्चच्या फेस्ताला (उत्सव) सादर होणारा तियात्र हा ख्रिश्चन समाजाचा एक लोकप्रिय नाट्यप्रकार म्हणजे कोकणी भाषेतलं संगीत नाटक म्हणावं लागेल. आपल्या पूर्वजांच्या मूळ परंपरा जपताना आजही काही घराणी देवी शांतादुर्गा आणि श्री मंगेशीला भजतात.

गोवा म्हणजे फक्त समुद्र किनारे, सोनेरी वाळू, दारू आणि अवास्तववादी भोगवादी चित्र डोळ्यांसमोर उभं करणाऱ्या जाहिरातींपासून सर्वार्थाने वेगळा गोवा आपल्या परंपरा सांभाळत नांदत आहे. त्या संदर्भातील काही मोजकेच उल्लेख इथे समाविष्ट केले आहेत. निसर्गावर भरभरून प्रेम करणारा, उत्सवप्रिय, आतिथ्यशील गोवा सर्वार्थाने पृथ्वीवरील स्वर्ग आहे.






**फरसाण, मिठाई, श्रीखंड, बासुंदी, गुलाबजाम** अशा चविष्ट-दर्जेदार-वैविध्यपूर्ण पदार्थांची **१०० वर्षांची 'गोड परंपरा'** असलेले कल्याणचे **'अनंत हलवाई'** यांचे २००३ पासुन डोंबिवलीतील यशस्वी वितरक म्हणजे **'कनक इंटरप्रायझेस'**, एक विश्वासार्ह नाव... !

स्वादिष्ट, रुचकर, घरगुती **पुरणपोळी, गुळ पोळी, उकडीचे मोदक, चिवडा, शंकरपाळे, भाजणीची चकली, स्पे. बेसन लाडु** व इतर पारंपरिक नाविन्यपूर्ण पदार्थ सातत्याने डोंबिवली परिसरातील ग्राहकांना पुरवून त्यांना आनंद समाधान देणे, हे आमचे ध्येय.

रोग्यांना निरोगी करणारी आणि निरोग्यांना अधिक उत्साही करणाऱ्या **'धन्वंतरी' आयुर्वेदिक फुड प्रोडक्ट्स्** चे वितरण, हा आमच्या व्यवसायाच्या सामाजिक बांधिलकीचा आदर्श नमुना.

चहा कॉफी शौकीनांसाठी **'सिंपली बेस्ट टी' - ममरी, फेमिली मिक्श्चर** आणि **हॉटेल डस्ट चहा** तसेच **'गोल्डन बेव्हरेजेस'**चा **भारदस्त लोकांचा 'जबरदस्त' चहा,** हे आमचे वैशिष्ट्य !

सुदृढ निरोगी आयुष्यासाठी गरज असते सात्विक, सकस आणि संतुलित आहाराची... त्यासाठी आवश्यक असणाऱ्या **शुद्ध, ताज्या व नैसर्गिक भाज्या, फळे, कडधान्य इत्यादीचा परस्पर** शेतकऱ्यांकडुन ग्राहकांपर्यंत निरंतर पुरवठा ही आमची नवीन सेवा - **कनक Oganic.**




**संस्थापक-मालक-चालक श्री मोहन भिडे**
अर्थात **'आपला गोड मित्र'** संपर्क - ९८२०४५१३४४



Sweet Family Friend!

**KANAK**ENTERPRISES
Everest Shopping Center
Opp. Railway Station, Dombivli-W
0251-2480 394

कनक

ugamcreative.in

# भिडे प्रतिष्ठानची स्वतःची वास्तू

भिडे प्रतिष्ठानची निर्मिती होऊन सुमारे १७ ते १८ वर्षे झाली. पंधरा वर्षांपूर्वी लावलेल्या रोपाचा आता वटवृक्ष झाला. संगणकाच्या युगात नवी दिशा, कार्यकर्त्यांची वृद्धी, कामाचा वाढता पसारा, प्रतिष्ठानच्या पारदर्शक व्यवहारामुळे लोकांशी निर्माण झालेला सुसंवाद, ह्यांमुळे प्रतिष्ठानची वृद्धी होत आहे ह्याबद्दल दुमत नाही. परंतु आजपावेतो मात्र भिडे प्रतिष्ठानची स्वतःची वास्तू झालेली नाही. सुमारे २ ते ३ वर्षांपूर्वी आम्ही भिडे अंकामध्ये आवाहन केले होते. सध्या गेली अनेक वर्षे पुणे व ठाणे येथील कार्यालयांसाठी अनुक्रमे श्री. शशिकुमार व श्री. चंद्रकांत भिडे ह्या कार्याध्यक्षांच्या औदार्यामुळे प्रतिष्ठान त्यांच्या मालकीच्या जागा विनामूल्य वापरत आहे. ह्याशिवाय प्रतिष्ठानच्या वेळोवेळी होणाऱ्या बैठकांसाठी सुद्धा नेहमीच मदत करीत असतात त्याबद्दल प्रतिष्ठान त्यांचे ऋणी आहे. परंतु मुद्दा असा आहे की, आपण किती वर्षे त्यांना त्रास द्यायचा ? ह्या दृष्टिकोनातून पुण्यामध्ये मध्यवस्तीच्या ठिकाणी किमान १०० चौ.फुटांची तसेच मुंबई येथे डोंबिवली, ठाणे, कल्याण ह्या उपनगरांत पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर, नाममात्र भाड्याने अथवा कोणी दानशूर भिडे कुलोत्पन्न प्रतिष्ठानकरिता जागेची देणगी देणाऱ्यांनी सुद्धा विचार करावा. १०० चौ.फुटापेक्षा अधिक मोठी जागा उपलब्ध असेल तर भिडे कुलातील शिकणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी किंवा बाहेरगांवहून येणाऱ्या भिडे व्यक्तींची सुद्धा त्या ठिकाणी सोय होईल असा सर्वंकष विचार करून हे आवाहन केले आहे. कार्यालयात कामासाठी येणाऱ्या व्यक्तीला आणि काम करणाऱ्या आमच्या सारख्या कार्यकर्त्याला सुद्धा सोईचे होईल. सुमारे २ ते ३ वर्षांपूर्वी 'आम्ही भिडे'च्या अंकात ह्या संबंधी आवाहन प्रसारित केले होते. परंतु पुन्हा एकदा आपण सर्वांनी ह्याचा विचार करावा असे मला वाटते. २०१८ ला म्हणजे पुढील कुलसंमेलनापर्यंत भिडे प्रतिष्ठानची स्वतःची वास्तू निर्मिती करायची असा निर्धार करू या.

**– दिलीप भिडे, सचिव/विश्वस्त, पुणे. मो. ९६५७५४१२३६**

**शिष्यवृत्ती विद्यार्थिनींसाठी...** भिडे कुलोत्पन्नांपैकी गरजू व हुशार तसेच शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी 'प्रदीप व शीला भिडे शैक्षणिक मदत'मधून भिडे प्रतिष्ठानकडून शैक्षणिक आर्थिक मदत/शिष्यवृत्ती सुरू केलेली आहे. इच्छुकांनी आपले नाव, पूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक, शिक्षण अर्हता आणि पालकांचे उत्पन्नासह माहिती प्रतिष्ठानच्या पत्रव्यवहाराकरिता असलेल्या पत्त्यावर त्वरित पाठवावी. सदरहू शिष्यवृत्ती/मदत विनापरतफेडीची आहे ह्याची नोंद घ्यावी.

## देणगीदार ऑक्टोबर ते डिसेंबर २०१६

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. श्रीराम श्रीपाद भिडे | चिपळूण | रु. १,००० | वाढदिवस देणगी |
| २) | श्री. प्रद्युन्म (राहूल) गोविंद भिडे | पुणे | रु. १,००० | आजीव सभासद |
| ३) | श्री. प्रकाश जनार्दन भिडे | देवगड | रु. १,००० | आजीव सभासद |
| ४) | श्री. किरण प्रकाश भिडे | देवगड | रु. १,००० | आजीव सभासद |
| ५) | सौ. वैशाली अजित सहस्रबुद्धे | कल्याण | रु. १,००० | देणगी |
| ६) | श्री. मिलींद पुरुषोत्तम भिडे | पुणे | रु. ५,००० | देणगी |
| ७) | श्री. माधव पुरुषोत्तम भिडे | पुणे | रु. १,००० | देणगी |
| ८) | सौ. गौरी लोमटे | पुणे | रु. १,००० | आजीव सभासद |

# A great and unique creation in the world of Indian languages




- Oblique form of each and every noun.
- Plural forms with respective oblique forms.
- The root of each and every verb.
- Verbs provided with negative form.
- The antonym of almost every word.
- Over 50,000 basic words.
- Over 750 illustrations.
- Special section, in colour, concerning distinct features of Konkani.
- A section on rules of Konkani orthography.

**Publication No. :** 937
**ISBN :** 978-81-7810-534-5
**Price :** ₹ 3700/-
**Pages :** 2200 Size : A5
(Subsidised Rate for Individuals on request)

**Editors**
Damodar K. Ghanekar
Suresh J. Borkar

**NOW ORDER ONLINE**

RAJHAUNS

# Goa Saunskrutik 2016




## A Directory of Writers & Publishers

Also Covers:

- History of Konkani Language
- Uniform Civil Code
- Sahitya Akademi & other awards, and rewards
- Opinion Poll of Goa
- PIN Codes... and so on

192 Pages, Size : 15.5cm x 23.5cm, Price : ₹ 100/- (self-subsidised)

**NOW ORDER ONLINE**

ISBN 978-93-7810-905-8

राजहंस®
RAJHAUNS SANKALPANA PVT LTD
1-Meenakshi Bldg, Dr. Wolfango da Silva Marg, Panaji - Goa 403 001
Ph.: +91 832 222 0320 / 223 2177 Fax: +91 832 242 5205
Email : rajhaunsgoa@gmail.com I Website : www.rajhauns.com

# विद्यार्थी गुणगौरव

**गट क्र. ३ – १० वी शालांत परीक्षेत ८०% पेक्षा अधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी**

**१) कु. शिवानी शिरीष भिडे, गोवा विभाग, ९६% गुण.** सध्या वसंतराव डेंपो, एच.एस.एस. कुजिरा, गोवा मध्ये शिक्षण घेत आहे. वडील श्री. शिरीष गोवा येथे प्रोफेसर आहेत, तर आई सौ. स्मिता ह्या गोव्यात पोस्ट ऑफिसमध्ये नोकरीत आहेत.



**गट क्र. ४ – १० वी शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी होणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी**

**१) कु. शिवानी शिरीष भिडे, गोवा विभाग, ९६% गुण.** श्रीमती प्रियंवदा श्रीपाद भिडे, प्रभादेवी, मुंबई पुस्कृत, कै. श्रीपाद सखाराम भिडे यांचे स्मरणार्थ हे पारितोषिक.

**गट क्र. ५ – इ. १२ वी शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी होणारा विद्यार्थी**

**१) चि. ओंकार मिलींद भिडे, पुणे विभाग, ९०.३१% गुण.** डॉ. सौ. शुभदा चारुचंद्र भिडे, सांगली पुरस्कृत, कै. के. वि. तथा दादुकाका भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ हे पारितोषिक.



**गट क्र. ७ – इ. १२ वी परीक्षेत वाणिज्य शाखेत ७५% पेक्षा अधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी**

**१) चि. ओंकार मिलींद भिडे, पुणे विभाग, ९०.३१% गुण.** पुणे येथे गरवारे कॉलेज येथे शिक्षण घेत आहे. वडील श्री. मिलींद भिडे पुण्यात एका कंपनीत नोकरी करतात, आई पॅथॉलॉजिस्ट कन्सल्टंट म्हणून पुण्यात एका हॉस्पिटलमध्ये नोकरी करते. चि. ओंकारची सी.ए. होण्याची इच्छा आहे.

**गट क्र. १२**

**१) चि. ऋषिकेश नरेंद्र देव**

आर्किटेक्ट ह्या शाखेत पुण्यामध्ये शिकत आहे. वडील श्री. नरेंद्र पुण्यामध्ये महाविद्यालयात प्राध्यापक असून आई सौ. कीर्ती ह्या खाजगी नोकरी करतात. चि. ऋषिकेशला भावी यशासाठी शुभेच्छा.



**गट क्र. १३**

श्री. प्रदीप वासुदेव आणि डॉ. शीला प्रदीप भिडे, दिल्ली पुरस्कृत गरजू व गुणवत्ता प्राप्त शालेय अथवा महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी विनापरतफेड विशेष आर्थिक मदत देण्यात आली.

| | |
|---|---|
| १) कु. गौरी दिवाकर भिडे, माभळे | रु. ४५,००० |
| २) कु. लीना अरुण भिडे, पुण | रु. १५,००० |
| ३) कु. समिधा मुकुंद भिडे, चिपळूण | रु. १०,००० |
| ४) कु. रचना श्रीधर भिडे, पुणे | रु. ३१,००० |

**✻ नम्र सूचना : ज्या कुलबंधू, भगिनी व माहेरवाशिणींना 'आम्ही भिडे'चा अंक मिळत नाही अथवा प्रतिष्ठानकडून कोणताही पत्रव्यवहार होत नाही त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क साधून आपला पत्ता व फोन नंबर कळवावा. तसेच अंक दोनदा मिळत असेल त्यांनी त्वरित कळवावे.**

**दिलीप भिडे, पुणे – ९६५७५४१२३६**
**ले.क. सुनिल भिडे, पुणे – ९६२३०१७४४४**
**सौ. संपदा भिडे, मुंबई – ९८१९९५१३९१**
**प्रदीप भिडे, डोंबिवली – ९८९२५०४०४२**

# BHIDE & SONS PVT. LTD.

**AN ISO 9001 : 2000 COMPANY**

**Head Office :** Timber Area, Shivajinagar [N], Sangli-416 416 Mah. [INDIA] **Tel. :** +91-233-2375011 **Fax :** +91-233-2376804
**Pune Unit :** T-145, M.I.D.C Bhosari, Pune-26. **Cell. :** 9225 8181 25 **E-mail :** bhidesons@yahoo.co.in

## AGRICULTURE & GARDEN WASTE RECYCLING MACHINES

**CHIPPER SHREDDER CS-33**



Power Require : **5 to 10 H.P.**
Output Capacity : **500 Kg / hr.**
Engine Driven Model also available

**CHIPPER SHREDDER CS-50**



Power Require : **15 to 20 H.P.**
Output Capacity : **1 Tonn / hr.**
Motor Driven & Engine Driven Model also available

**CHIPPER C-80**



Power Require : **25 to 30 H.P.**
Output Capacity : **3 Tonn / hr.**
Motor Driven Model also available

**CHAFF CUTTER**



Power Require : **2 H.P./ 3 H.P. / 5 H.P.**
Output Capacity : **200 Kg / hr., 400 Kg / hr., 900 Kg / hr.**
Motor driven & Engine Driven Model also available

## INDUSTRIAL PRODUCTS

### PISTON VALVES
**(FOR STEAM-LINE)**



**IBR & Non IBR Piston Valve**
**Class 150, Class 300 & PN 40**
**Size 15 mm to 150 mm**

### HIGH PRESSURE RECIPROCATING PUMPS (POWER PUMP)




**Pressure - From 30 kg/cm$^2$ to 300 kg/cm$^2$**
**Application - Chemical Injection, Cleaning Drainage Pipes, Boiler feed etc.**

### CASTINGS



**Heavy C.I. Castings**
**Maximum single piece - 2 Tonn**

### S.G.IRON FOR AUTO COMPONENTS



**Castings :**
**Steel, Stainless Steel & S.G. Iron**
**Range - From 1 kg. To 100 kg.**

### LADDLE



**Foundry Crane Laddles**
**Capacity : Upto 20 Ton**

# प्रतिष्ठानचे पुरस्कार

## संस्कृत पुरस्कार - २०१७

डॉ. सौ. धनश्री धनंजय भिडे, पुणे यांना श्रीमती सुमती वा. भिडे आणि कै. वामनराव वि. भिडे, पुणे पुरस्कृत त्यांचे बंधू कै. डॉ. विद्याधर विश्वनाथ भिडे, पुणे यांचे स्मरणार्थ 'संस्कृत पुरस्कार २०१७' गोवा येथे होणाऱ्या भिडे कुल संमेलनात प्रदान करण्यात येत आहे. सौ. धनश्री पुण्यामध्ये एम.ए. करून डेक्कन कॉलेज पुणे येथे 'क्रिटिकल स्टडी ऑफ प्रबोध सुधाकर' हा प्रबंध घेऊन डॉक्टरेट प्राप्त केली. तत्त्वज्ञान व गणित ह्या विषयाची विशेष आवड असल्याने प्रबोध सुधाकर हा ३०० श्लोकांचा तत्त्वज्ञानावरील ग्रंथ अभ्यासासाठी निवडला. ह्या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे एकाच ग्रंथात मोक्षप्राप्तीसाठी ज्ञान व भक्ती या दोन्हीही गोष्टी समान मानल्या गेल्या आहेत. इतर ग्रंथांमध्ये असे आढळून येत नाही. या प्रबंधासाठी ३४ हस्तलिखितांचा अभ्यास करून ग्रंथाची नवीन आवृत्ती तयार केली. ह्या प्रबंधासाठी डॉ. सौ. धनश्री भिडे यांना डॉ. ललिता देवधर यांचे मार्गदर्शन मिळाले. ह्या ग्रंथाची भाषा संस्कृत असून लिपी देवनागरी आहे. ह्या यशाकरिता भिडे प्रतिष्ठानकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन.



## कला पुरस्कार २०१७

कु. अंतरा प्रभाकर भिडे, रायबंदर, गोवा यांना श्रीकुमार विष्णू आणि श्री. वसंत विष्णू भिडे, सांगली पुरस्कृत त्यांचे बंधू कै. सुभाष विष्णू भिडे सांगली यांचे स्मरणार्थ 'कला पुरस्कार २०१७', गोवा येथे होणाऱ्या भिडे कुल संमेलनात प्रदान करण्यात येत आहे. कु. अंतरा ह्यांनी अर्थशास्त्रामध्ये पदवी मिळाल्यानंतर नाट्यक्षेत्रामध्ये प्रवेश केला. लहान असल्यापासूनच कथाकथन, एकांकिका, पठण, नृत्य, गायन अशा विविध क्षेत्रांमधून अनेक पारितोषिके मिळविली आहेत. तसेच वेदहरण, भित्यापाठी ब्रह्मराक्षस, भुरग्यांचे मानसशास्त्र इत्यादी नाटकांमधून विविध भूमिकाही केल्या. पणजी येथे गोवा कला अकादमी येथे ६ वर्षे शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले आहे. परिकथांना वळण देणारे इंग्रजी काव्यनाट्य लिहिले. कविता लिहिण्याच्या छंदाबरोबर अनेक कार्यक्रमांमध्ये सूत्रसंचालन सुद्धा करतात. गोवा राज्यामधील बालश्री पुरस्कार, वयाच्या १५ व्या वर्षी गोमन्त बालभूषण पुरस्कार इत्यादी अनेक पुरस्कारही मिळविले आहेत. दै. नवप्रभा आणि दै. सुना परांत ह्या दोन वेगवेगळ्या भाषांच्या वर्तमानपत्रांमधून सतत २ वर्षे स्तंभलेखनही केले आहे. ह्या त्यांच्या कर्तृत्वाची दखल स्थानिक वृत्तपत्रांनी सुद्धा घेतली आहे. अशा ह्या बहुविध आणि गुणवंत कलेचा खास गौरव भिडे प्रतिष्ठान कला पुरस्कार देऊन करीत आहे.



## 'आपली सून' पुरस्कार २०१७

सौ. मालिनी रामकृष्ण भिडे, रायबंदर, गोवा यांना हा पुरस्कार सौ. मेधा तथा अनुराधा अविनाश भिडे, मिरज यांनी पुरस्कृत केला आहे. माहेरच्या गणपत आणि अन्नपूर्णा सहकारी यांच्या ज्येष्ठ कन्या ३६ वर्षांपूर्वी लग्न होऊन २० ते २५ जण असलेल्या एकत्र कुटुंबात आल्या. पणजी येथे नोकरी सांभाळून घरामधील सर्वांची मने सांभाळून संसार केला. घरामधील प्रत्येकाची दखल घेताना हसत सेवा करताना त्या घराची कन्या म्हणून होऊन राहिल्या आहेत. सौ. मालिनीताई दिरांची वहिनी, नणदां–



भिडे संमेलनाला

हार्दिक शुभेच्छा

# मंगलम् ट्रेडिंग कंपनी

## जनरल मर्चन्ट ॲण्ड कमिशन एजंट

४०५, मार्केट यार्ड, सिंडिकेट बँकेसमोर, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७.
फोन : २४२७०९३०, २४२७०९४०, मो. ९३७१००६१९७, ९८९०२७१००५



**साखर, गहू, ज्वारी, तांदूळ, डाळी, आटा, रवा, बेसन, मैदा, कडधान्ये, साबुदाणा यांचे होलसेल व्यापारी**

**रविवारी बंद**

**✻ सुलेखचंद जैन ✻ संदीप जैन**

जावांची सखी त्यामुळे ह्या घरची यशोदा असे म्हणणे वावगे ठरणार नाही. योगविद्येचे शिक्षण घेतल्यामुळे गोव्यामध्ये अनेक शिबिरांमध्ये सक्रिय सहभाग असतो. नोकरीतून निवृत्तीनंतर सुद्धा 'गीता सोपानम्' या परीक्षेत विशेष यश संपादन केले आहे. अध्यात्माची आवड जपताना योगसाधनेची सुरुवात करून रायबंदर गोवा येथील 'आश्रम व गोपाळ या संस्थांच्या गीता प्रबोधन व प्रसार आणि दारुमुक्त समाज या उपक्रमात मार्गदर्शक या नात्याने सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या आपल्या सुनेला त्रिवार वंदन !

## 'माझी आई' पुरस्कार २०१७

सौ. स्वाती प्रदीप भिडे, मु. वन, गोवा यांना 'श्री. रवींद्र रावजी भिडे, कल्याण पुरस्कृत त्यांची आई कै. सुशीला रावजी भिडे, कल्याण यांचे स्मरणार्थ' 'माझी आई पुरस्कार २०१७' गोवा भिडे कुल संमेलनात प्रदान करण्यात येत आहे. सौ. स्वाती



एम.ए. (इंग्लिश) असून माहेरच्या कै. भिकाजी व आनंदी जोशी यांच्या कन्या. घरामध्ये लग्न होऊन सून म्हणून आल्यानंतर कुटुंब मोठं असल्यामुळे ह्या आईने आपली कर्तव्य व जबाबदारी ह्यांमध्ये कधीच कसूर केली नाही. घरातील आजारपण व इतर संकटांच्या वेळी धीराने तोंड दिले. गोव्यातील वन गावामध्ये सुद्धा काही कार्याच्या वेळी सासवा-जावांना त्यांची उपस्थिती असल्याशिवाय लाडू वळले जात नाहीत हे विशेष. अशा ह्या सदाप्रसन्न, स्वागतशील आणि बहुगुणी अशा व्यक्तीचा माझी आई पुरास्कारासाठी सन्मान केला जात आहे.

### उद्योजक पुरस्कार - २०१७

श्री. सुरेश श्रीरंग भिडे, गोवा यांना श्री. कुमार विष्णू भिडे, सांगली पुरस्कृत त्यांचे वडील कै. विष्णुपंत तथा अण्णासाहेब भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ 'उद्योजक पुरस्कार २०१७' गोवा येथे होणाऱ्या भिडे कुल संमेलनामध्ये देण्यात येत आहे. श्री. सुरेशराव यांनी १० वी झाल्यानंतर आय. टी. आय. गोवा येथून २ वर्षांचा तांत्रिक शाखेचा अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यानंतर झुआरी केमिकल कंपनीमध्ये प्रशिक्षणार्थी आणि त्यानंतर ३ वर्षे ऑटोमोबाईल



खाजगी कंपनीत नोकरी केली. १९९६ मध्ये एझेड आणि त्यासंलग्न उपकरणांची दुरुस्ती ह्या स्वतःच्या व्यवसायाची मुहूर्तमेढ केली. त्या दरम्यान वाहनधारकामध्ये इंधन बचत करण्यासाठी वाहनांना गॅसकीट बसवून देण्याचा व्यवसाय सुरू केला. गॅसकीट बसविणे, गॅस भरणे व दुरुस्ती अशी सर्व कामे एकाच ठिकाणी असल्यामुळे ग्राहकांना गोव्यामध्ये ह्या सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्या. त्याचबरोबर उद्योग व्यवसायाचा विस्तार करताना स्थानिक माणसालाही रोजगार उपलब्ध करून दिला. आजपावेतो हजारो गाड्यांसाठी ही गॅस यंत्रणा बसवून ह्या व्यवसायात त्यांनी वृद्धी केली आहे. ह्या शिवाय रायबंदर येथून पानवेल क्रिकेट क्लबमधून क्रिकेटही खेळतात.

## वैदिक पुरस्कार २०१७

श्री. माधव वासुदेव भिडे, सातारा यांना श्रीमती सुमती बा. भिडे आणि कै. वामन वि. भिडे पुरस्कृत त्यांचे वडील कै. अहिताग्नी विश्वनाथ नारायण आणि आई कै. दुर्गाबाई भिडे, पुणे यांचे स्मरणार्थ 'वैदिक पुरस्कार - २०१७' गोवा येथे होणाऱ्या भिडे



कुल संमेलनात प्रदान करण्यात येत आहे. श्री. माधवराव यांचा जन्म साताऱ्यात भिक्षुक घराण्यात झाला. हे बी.कॉम. असून सध्या बँकेत नोकरीस आहेत. शालेय शिक्षणाबरोबरच घरामध्ये वडील

काका हे दोन्ही वेदमूर्ती असल्यामुळे आणि उपजीवि-केचे साधन ह्याकडे न पाहता आवडीने दोघांकडून वेदाध्ययनाचे शिक्षण घेतले. घरातच संथा मिळाल्यामुळे घरचीच पाठशाळा आणि स्पष्ट शब्दोच्चार, त्यातील बारकावे कायम शिकायला मिळाले. सातारा येथे त्यांच्या तोडीचा म्हणजे सर्वगुण संपन्न अशी भिक्षुकी करणारी व्यक्ती मिळणे दुर्मिळ हे म्हणणे वावगे ठरणार नाही. या वर्षी बँकेच्या नोकरीतून निवृत्त होत आहेत. श्री. माधवरावांनी मुंज, विवाह, उदकशांती, देवे, ब्रह्मणपतीसुक्त, संहिता यांमध्ये पारंगतता मिळविली आहे. मंत्राबरोबर यातील तंत्र सुद्धा अत्यंत निपुणतेने सांभाळतात. ह्या बरोबरच त्यांनी हौशी व गरजू विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य केले आहे. या योगे वेदाध्ययनाचे धडे देऊन त्यांना उपजीविकेचे साधन निर्माण करून त्यांचे संसार उभे करण्यास मोलाची मदत केली आहे. याबरोबरच कॅरम व टेबलटेनिसमध्ये अनेक पारितोषिके मिळाली. २०१३ मध्ये सातारा भिडे कुल संमेलन आयोजित करण्यासाठी त्यांचा मोलाचा वाटा होता. अशा ह्या बहुगुणी, सर्वगुणसंपन्न व्यक्तीचा सन्मान भिड्यांच्या कुटुंबात होत आहे ही बाब कौतुकास्पद आहे.

## क्रीडा पुरस्कार २०१७

श्री. सुरेश श्रीरंग भिडे, गोवा यांना श्री. रा. म. भिडे, निगडी, पुणे पुरस्कृत त्यांचे वडील कै. श्रीकृष्ण भिडे यांचे स्मरणार्थ' 'क्रीडा पुरस्कार - २०१७' गोवा भिडे कुल संमेलनात प्रदान करण्यात येत आहे. इ. १० वी नंतर आय. टी. आय. मध्ये शिक्षण घेताना इन्स्टिट्यूटच्या संघात क्रिकेट खेळात प्रथम



फलंदाज म्हणून निवड. खेळातील कौशल्यामुळेच शालेय जीवनात शाळेच्या क्रिकेट संघात समावेश. रायबंदर, गोवा पानवेल स्पोर्टस् क्लबकडून १९९० ते २०१२ मध्ये समावेश होता. १५ वेळा संघाचे कर्णधारपद. त्यांच्या नावावर २ शतके आणि २० अर्धशतकांची नोंद आहे. सामनावीर किताबही पटकावला आहे. अशा ह्या हरहुन्नरी खेळाडूचे हार्दिक अभिनंदन !

## आदर्श कार्यकर्ता पुरस्कार - २०१७

श्रीमती शशीताई मुरलीधर घुले (भिडे) यांना 'कै. दामोदर तथा दामुकाका केशव भिडे, डोंबिवली यांचे स्मरणार्थ त्यांची मुलगी सौ. नेहा सातर्डेकर, डोंबिवली पुरस्कृत आदर्श कार्यकर्ता पुरस्कार २०१७' गोवा भिडे कुल संमेलनात प्रदान करण्यात येत आहे. श्रीमती शशीताईंचे शिक्षण एम.ए.पर्यंत पूर्ण असून वयाची पंचाहत्तरी ओलांडूनही त्यांची



प्रतिष्ठानमध्ये सक्रिय कार्य करण्याची ऊर्मी तरुणांना लाजवेल अशी आहे. आजमितीला सुद्धा नृत्य, संगीत व प्रवास हे छंद जोपासतात. भिडे प्रतिष्ठानचे कार्य गेली १० वर्षे करीत असून वयाने ज्येष्ठ असून सुद्धा थकणे हे त्यांच्या शब्दकोशातही नाही. संमेलना-अगोदर तेथील जागा निश्चिती, मार्गदर्शन, तसेच वेगवेगळ्या संकल्पना देऊन भिडे प्रतिष्ठानच्या कार्यात चेतना निर्माण करणाऱ्या ह्या भिडे भगिनीचा सन्मान होताना खूप आनंद होत आहे. प्रतिष्ठानच्या कार्यक्रमांमध्ये महिलांना समाविष्ट करण्यासाठी प्रथम प्राधान्य दिले. सामाजिक बांधिलकीतून भिडे प्रतिष्ठानप्रमाणे अनेक संस्थांशी निगडित असून विशेषतः समाजातील अनाथ मुलांचा सांभाळ करून त्यांचे लग्नकार्य करून देऊन संसार थाटून दिलेला आहे. स्व. दामुकाकांची प्रतिष्ठानशी असलेली जवळीक सर्वांना ज्ञात असल्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ कार्यकर्त्याला दिला जाणाऱ्या पुरस्कारासाठी विशेष गौरव आहे.

## जावा धनी

जावा धनी बिगी बिगी
औत धरा शेतामंदी
पोरी टोरी लेंडारास्नी
ठाय वाडून येऊ कंधी
न्ह्येरी करूनशान जावा
दोंपारची संग न्ह्यावा
मला न्हाई येळ बगा
कुटं पुरू कशी दावा
आटवडं झालं दोन
डोईला ना थेंब त्येल
ढाळ न्हानग्या बाबीला
वशीदबी न्हाई बयेलं
पटकी आली म्हाताऱ्याला
सदा त्येंची बी किरकीर
पाची झाल्या पोरीच
आता कुठून मी आनू पोरं ?
नशीबाची माझ्या घ्येवा
रीत न्हाई काई बरी
ऐका जाताना जननच जावा
येताना या सापं घरी

*– डॉ. सौ. प्रतिभा भिडे*
ठाणे. मो. ९८३३२८४६९०

## मज बोलता न येते

मज बोलता न येते, नुसतीच ऐकते मी
लावा कसेही बोल, मजला विषाद नाही
मिळतील दूषणे, मी ईश्वरा वाहते
त्यातील अंश थोडा, उदरी प्रसाद घेते
दुस्वासती कुणी हा माझा प्रसाद नाही
लावा कसेही बोल, मजला विषाद नाही
कंगाल मी भणंग, टाकाऊ या जगात
ऐश्वर्य भावनांचे, श्रीमंत मी मनात
अपमान घ्या अव्हेरी मज त्याची खंत नाही
लवा कसेही बोल, मजला विषाद नाही
माझ्या मनात येती तृप्तीस नांदवावे
करतील विद्ध क्षण जे, त्यांना निरोप द्यावे
सोसून लेज येते जाळून आसवांही
लवा कसेही बोल, मजला विषाद नाही
तृप्तीस भोगण्याचा, आनंद मज गमे
माझ्याच अलगुजाची, श्रवणीय स्पंदने
आनंद डोह माझा, मी डूब त्यात घेई
लवा कसेही बोल, मजला विषाद नाही

– डॉ. सौ. प्रतिभा भिडे (ठाणे)
९८३३२८४६९०

## गंध

गंध मधुर श्वास उमलला
प्राजक्तासम बहरून आला
सडा घालुनी मांगल्याचा
कणकण मम पुलकीत झाला
पहाटवारा झुले त्यासह
प्रसन्न बघ आत्मा झाला
प्रीती पुजेस्तव बघ कसा
आज मम अंगणी फुलला
एक करते तव पालनपोषण
दुजी लुटतसे गंध अनामिक
काय सांधतो न कळे मुरलीधर
हासतो पाहुनी त्यास मनोमन
कळले मजसी आज अचानक
कृष्ण सखा गं मनी हसला
दोन प्रियांच्या मध्येच अलगद
हा असा बहरून आला

– सौ. स्नेहल विजय भिडे (ठाणे)
९८१९३९८-४३

## संवाद

थोडा तरी संवाद हवा, कधी मनसोक्त गप्पा तर
कधी कॉफी दोघांच्या हातातली, निःशब्द शांतता
फक्त आपुलकीचा धागा हवा, थोडा तरी संवाद हवा
कधी नुसता आवाज ऐकावा, कधी नुसता हातात हात घ्यावा
कधी विनाकारण भटकंती, तर कधी नुसता सहवास हवा
थोडा तरी संवाद हवा
कधी ऐकावीत गझल गाणी, तर कधी खावी पुरी आणि पाणी
कधी खावी मस्त भेळ नि ठेवावा एकमेकांमध्ये मेळ
प्रेमाचा झरा वाहताच राहावा, थोडा तरी संवाद हवा
तोच झालाय आता दुर्मिळ, बोलण्यातच बसत चाललीये खीळ
दूरचे जवळ आणि जवळचे लांब, बोलायला जावे तर म्हणतात थांब
शब्दांचा पूल बांधायला हवा, थोडा तरी संवाद हवा

*– सौ. प्रिती भिडे,* पुणे. ९९२२९४४०८२

# ऋषितुल्य दादा !

– सौ. मालिनी रा. भिडे
रायबंदर, गोवा

दादांचा जन्म दत्तजयंतीचा आणि साहजिकच नाव दत्तात्रय, दत्तात्रय व्यंकटेश भिडे. त्यांचे आई–वडील डिचोलीतील 'वन' गावात राहायचे. बागायती आणि शेती हाच वडिलोपार्जित व्यवसाय. तिथेच त्यांचे भाऊबंद म्हणजे अजून भिडे कुटुंबे पण होती आणि अजूनही आहेत. दुर्दैवाने त्यांच्या बालपणीच साथीच्या रोगामुळे आई–वडिलांचे छत्र हरवले आणि त्यांच्या मामांनी दादांना सांभाळायचा भार उचलला.

त्यांचे मामा म्हणजे गोव्यातील मराठे कुटुंबातील भिक्षुकी करून वैदिक जीवन पद्धतीने राहणारे. त्याकाळी संस्थानिक आपल्या मुलांच्या मुंजी मोठ्या थाटात करत तसेच इतर गरीब ब्राह्मण मुलांच्या मुंजी पण बरोबर करत. असेच तेव्हा कुरुंदवाडचे संस्थानिक आपल्या मुलाच्या मुंजीनिमित्त इतर शंभर ब्राह्मण मुलांच्या मुंजी करणार म्हणून कळलं व दादांची मुंज पण कुरुंदवाडला केली गेली.



दादांचे मामा रायबंदर गावात येऊन राहिले. रायबंदर म्हणजे गोव्याच्या राजधानी पणजीतलंच एक गाव. पोर्तुगीजांच्या दडपणाला भिऊन शहरातील ब्राह्मण कुटुंबे शहरे सोडून लांब गावात किंवा गोवा सोडून गेली होती. विसाव्या शतकात थोडी राजकीय परिस्थिती बदललेली आणि हिंदूंची लोकवस्ती पणजीच्या आसापास वाढू लागलेली. तेव्हाच दादांचे मामा भिक्षुकी करून कुटुंब चालवायला योग्य जागा असं धरून इथे भाड्याने जागा घेऊन राहायला आले. घराचे मालक म्हणजे म्हांबरे कुटुंब. त्यांच्या घरात पण दादांबरोबरीची मुले होती.

म्हांबरे सारस्वत, तसेच शेजारी बरीच सारस्वत कुटुंबे होती. शिक्षण घेण्यास योग्य अशी ह्या घरातही मुले दादांबरोबर होती. दादा त्यांच्याबरोबर शाळेत जाऊ लागले. त्या वेळी गोवा पोर्तुगीज सत्तेखाली असल्यामुळे मराठी भाषेतील शिक्षण कसंबसं चौथीपर्यंतच चालायचं. तेही घरीच मुलांना शिकवायचे. दादांच्या शिक्षणाची ही सोय रायबंदरला नीट जुळली. शाळा म्हणजे पोर्तुगीज भाषेतून चालणाऱ्या असायच्या. हिंदूंची फारच थोडी मुले ह्या शाळांतून शिकायची. खरं म्हणजे ते शिक्षण कठीणच होते. अगदी हुशार मुलेच तिथे टिकायची. दादांची बुद्धी तल्लख व स्मरणशक्ती दांडगी. त्यांनी कधी मागे पाहिले नाही आणि 'किसेव' ही फार कठीण परीक्षा उत्तीर्ण झाले. गोव्यातून अगदी थोडकी मुले ह्या परीक्षा देऊ शकत. जादातर विद्यार्थी ख्रिश्चनच असत. हिंदू विद्यार्थी अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतके असायचे. चित्पावन ब्राह्मणात त्या वेळी ते एकमेव 'किसेव' पास झालेले होते. त्यांच्या हुशारीमुळे सारे गावकरी मायेने आणि प्रेमाने त्यांच्याकडे पाहत आणि मदतीचा हात देण्यास तयार असत.

मामांकडून त्यांनी संध्या, पूजा, रुद्र, पवमान आदींचे पाठ पण घेतले होतेच. त्यामुळे पोर्तुगीज भाषेबरोबर संस्कृत भाषेचे ज्ञान सुद्धा त्यांनी आत्मसात केले होते. शिस्त व सुसंस्कृतीचे धडे सुद्धा बरोबर होतेच.

पुढे त्यांना पोर्तुगीज सरकारची उच्च पदावर नोकरी मिळाली. खरं तर त्या वेळी ख्रिश्चनच माणसांना सरकारी नोकरी मिळे. पण दादा त्याला अपवाद ठरले आणि कौतुकास पात्र झाले. गोव्यातील मराठे कुटुंबातील योग्य मुलीशी लग्न करून ते रायबंदर याच गावात स्थायिक झाले.

दादा म्हणजे माझे सासरे. मी त्यांची सून म्हणून ह्या घरात आले तेव्हा त्यांनी पंचाहत्तरी ओलांडलेली. ते इथे राहायला आले तेव्हा म्हणे इथे एकच खोली होती आणि दोन्ही बाजूंनी रानटी झाडीच वाढलेली होती. अशी जागा दादांनी घेऊन आपल्या आवडीनुसार जगण्यास योग्य बनवली होती. त्यांचे मूळ गाव 'वन', तिथे राहून नोकरी करणे शक्य नव्हते. म्हणून त्यांनी वनांत व तेथील

बागायतीत असणारी साऱ्या प्रकारची झाडे इकडे लावली आणि एक छोटं 'वन' रायबंदरात बनवलं. घराच्या एका बाजूला विहीर व आजूबाजूला रोजच्या गरजेला लागणारी झाडे जसे की केळ, पेरू, पपई, पोफळी, निरफणस, पानवली वगैरे. माड म्हणजे नारळाची झाडे, आंबे, फणस तर होतेच. देवपूजेला लागणारी म्हणजे बेल, शमी, तुळशी, दूर्वा आणि सारी फुलझाडे ह्यांचीही व्यवस्था नीट जोपासली होती. दूधदुभत्या करीता गोव्यात गाई-म्हशी होत्याच.

त्यांच्या संसाररूपी वटवृक्षाच्या फांद्या आज युरोप-अमेरिकेपर्यंत पोहोचल्या आहेत. आई-दादांना पाच मुलगे व तीन मुली. सगळी मुले उच्चशिक्षित आणि घरी दादांच्या आज्ञेत तसेच शिस्तीत राहणारी. मुलांच्या मुंजी झाल्यावर त्यांना संध्या, पूजा, रुद्र वगैरेचे पाठ घरीच दिलेले. तसेच झाडावर चढून फळे काढणे, भातापासून तांदूळ काढणे, गाई-म्हशींचे दूध काढणे, जळणासाठी लाकडे तोडणे वगैरे कामे ते स्वतः करत व मुलांकडून पण करून घेत. त्यामुळे घरातील सगळेच स्वावलंबी बनले.

पन्नास वर्षांपूर्वी आपल्या ज्ञातीतील माणसे इतर जातीच्या माणसांच्या हातचं पाणी सुद्धा घेत नसत. पाण्यापासून बनविलेले पदार्थ तर नाहीच नाही. ह्यामुळे असं व्हायचं की परगावी गेल्यावर एक तर उपाशी राहायचं किंवा आपल्या ज्ञातीतील एखादं कुटुंब असेल तर शोधून, तिथे जायचं हेच पर्याय होते. आमचं घर राजधानी पणजी शहराला जवळ असल्यामुळे गोव्यातील खेड्यापाड्यातील ज्ञातीबांधव, सरकारी कामानिमित्त किंवा हॉस्पिटल मधील उपचारांनिमित्त किंवा शिक्षणकार्यानिमित्त पणजीस आल्यावर दादांच्या घरी मुक्कामास येत असत. ती. आई आल्या-गेलेल्यांचं हसून स्वागत करीत असे. खूपदा येणारी माणसे ओळखीची किंवा नात्याची नसत. परंतु कुणाची तरी ओळख सांगून तेव्हा आल्यास त्याला योग्य तो पाहुणचार मिळे. कधी कधी पाहुणे उशिरा आल्यास ती.आईंना दुसऱ्यांदा स्वयंपाक करावा लागे. त्याची त्यांनी कधीच खंत बाळगली नाही. रोजच्या जेवणाला किमान दोन पाहुणे असायचेच. त्यावेळचं जेवण म्हणजे भात, आमटी, भाजी, ताक, लोणचं इत्यादी. भाताचं पातेलं त्याला तपेलं म्हणतात, अजून आहे. त्यात पाणी भरल्यास आता आम्हाला चार दिवस पुरतं एवढं मोठं.

दादांचं घर म्हणजे एक आश्रमच होता. हल्लीच्या घरांप्रमाणे तिथे एक सुद्धा बेडरुम नव्हती. बायका मंडळी आत तर पुरुषमंडळी बाहेर पडवीवर झोपायचे. मुलांना लहानपणापासून ह्याची सवय झालेली आणि पाहुण्यांच्या घोळक्यातच त्यांचं शिक्षण चालायचं. घरातील मेहनतीची कामे मुलगे करायचे आणि नंतरच शाळेला जात. रुद्राचे पाठ मुलांनी घरीच घेतलेले. मग दर रविवारी 'एकादशणी' करायची हे ठरलेले. म्हणजे रविवार असला तरी आठ वाजता अंगोळ, नाश्ता करून देवघरात यावेच लागे.

घरात दादांची शिस्त भारी होती. वेळेवर उठणे, वेळेवर सगळ्यांनी एकत्र जेवणे, अभ्यास आणि झोपणे सुद्धा ठरल्या वेळीच असायचे. घरातील कुणीही त्यात बदल करायचा नाही ही शिस्त. पाहुण्यांसाठी मात्र दादा मवाळ असत. अवेळी आलेल्या पाहुण्यांची सोय आई शांतपणे पाही. दादांबरोबर त्यांनी सुद्धा हे मदतीचे व्रत स्वीकारलेलं. त्या आनंदाने आणि हसतमुखाने त्यांचे स्वागत करत आणि हवी ती मदत करीत असत.

माझं माहेर रायबंदरपासून ४० कि.मी. दूर आहे. आमचा भिडे कुटुंबाशी काहीच परिचय नव्हता. परंतु लग्न ठरल्यावर बऱ्याच परिचित माणसांनी दादांचे खूप गुणगान गाऊन त्यांना 'देवमाणूस' संबोधलेलं मला आठवतं. ह्या देवमाणसाच्या घराचा उंबरठा ओलांडून त्यांच्या पाया पडले. हळूहळू मी त्यांच्या घरात रुळू लागले आणि दादांचं राहणीमान पाहून थक्कच झाले. मला ते एक 'ऋषी' असल्याचं भासू लागलं.

घरात शिरतानाच एका बाजूला दादांची खोली होती. खोली म्हणजे काय, फक्त दोन भिंती आणि वर छप्पर असलेली जागा. तिथे एक लाकडी पेटी, जिच्यात त्यांचं सामान होतं, आणि एक लोखंडी स्टँडवर ठेवलेली लाकडी फळी. ह्या फळीवर ते उन्हाळ्यात, पावसाळ्यात नि हिवाळ्यात झोपायचे, बुद्धिबळाचे पाट मांडायचे आणि बसून आलेल्या-गेलेल्यांशी बोलायचे. घराबाहेर जातानाचा त्यांचा पेहराव म्हणजे धोतर, सदरा, वर कोट व डोक्यावर टोपी. घरी आल्यावर पंचा नेसायचे आणि लाकडी 'खडावा' घालून घराबाहेरील जागेत फिरायचे. हे पाहून मला ते पुरातन ऋषीच आहेत असं वाटायचं. सकाळी म्हणजे पहाटेच तीन वाजता उठून पाणी गरम

करून अंघोळ वगैरे आटोपून रुद्र, पवमान, देवीसूक्त वगैरे म्हणायचे. तिन्हीसांजेला मुले व नातवंडांनी त्यांच्याबरोबर एकत्र बसून ईश्वर प्रार्थना, रामरक्षा आदी स्तोत्रे म्हणायची हे ठरलेलं होतं. या वेळी एखादं कुणी आलं नसल्यास त्याचं कारण नंतर सांगावं लागायचं.

दादा फक्त दोन जेवणे व एकदा नाश्ता घ्यायचे. मधे काहीही खायचे नाहीत. जेवण-नाश्ता वेळेवर लागायचं. जेवणात गोड आवडायचं. नसल्यास गूळ सुद्धा चालायचा. त्याचं रोजचं जेवणखाण व हवं नको सारं आईच बघायच्या. सारं कसं घड्याळ्याबरोबर शांतपणे चालायचं. एकदा आमच्याकडे काही कार्यक्रम होता आणि बरीच बायकामंडळी जमली होती. इकडे दादांच्या रात्रीच्या जेवणाची वेळ टळून गेली हे आमच्या लक्षात आलं नाही आणि जेव्हा सारी मंडळी गेली तेव्हा त्यांना जेवायला बोलावलं, बघतो तर ते एवढे चिडले होते की आईवर रागाने ओरडलेच, मला तर भीतीच वाटली.

पुढे काही वर्षांनी आई आम्हाला सोडून गेल्या आणि माझ्याकडून जेवणास उशीर झाल्यास ते तसे फार चिडायचे नाहीत, उलट मला वेळेचं महत्त्व पटवून द्यायचे जेणे करून पुढे मी त्यांच्या वेळा चुकवू नयेत. घराच्या आजूबाजूला काही फळ झाडे होती. फळे म्हणजे दोन प्रकारची. एक भाजी करिता वापरायची आणि दुसरी फळं म्हणून खायची. भाजीची फळे म्हणजे निरफणस, शेंगा, आंबडे, बिमलां, करमलां (याचं लोणचं पण बनतं) अन् खायची फळे आंबे, फणस, रामफळ, चिक्कू, नारळ वगैरे. भाजीची फळे गोव्यातील खास भाज्यांत धरली जातात. आमच्या घरातील फळे उत्तम प्रकारची पण होती. म्हणजे बाजारात विकल्यास चांगलाच भाव मिळाला असता. साऱ्या झाडांची काळजी दादाच घेत आणि तयार झालेली फळे स्वतः चढून काढत. त्यामुळे कच्ची निरुपयोगी फळे कधीच काढली गेली नाहीत. ही घरच्या बागेतील फळे घरी खायची आणि शेजारीपाजारी, ओळखीची मंडळी तसंच येणाऱ्याजाणाऱ्याला बांधून द्यायची हे ठरलेलं. एखाद वेळ असं व्हायचं की दादा भरपूर फळे आहेत म्हणून देत राहायचे आणि शेवटी घरात खायला शिल्लकच राहायची नाहीत. दादा जाऊन आज पंचवीस वर्षे झाली तरी काही माणसे ज्यांनी दादांना पाहिलंय ती दादांना आठवून कौतुकाचे उद्‌गार अजूनही काढतात.

काही झाडांवर पानवेली चढवलेल्या होत्या. झाडे उंच असल्यामुळे पानवेली पण उंचावर गेलेल्या असायच्या. ही पाने घरातील कोणीही खात नसत. तरीही शनिवारी संध्याकाळी आणि रविवारी एकादशणीचे सारे उरकल्यावर दादा मोठाल्या शिड्यालावून ह्या झाडांवर चढायचे आणि पानं खुंटायचे (काढायचे) दुपारी जेवणं, झोप उरकल्यावर ती काढलेली पाने ओळीने एकावर एक मांडायचे (ही कामे खरं तर बाजाराला पानं विकणारे करतात) रायबंदर गावातील आणि शेजारील गावातील काही मंडळी ही पाने खात असत. ते हमखास रविवारी संध्याकाळी दादांकडे येत, चार गप्पागोष्टी करत आणि दादा त्यांच्या हातावर मोठाली पानांची जुडी ठेवत. ती घेऊन आनंदाने ते जात पुढच्या रविवारी भेटण्याचं ठरवूनच. आठवडाभराची सोय त्यांची झालेलीच होती. पाने खाणारी मंडळी बहुतेक कष्टकरी समाजातील असत. देवपूजेसाठी लागणाऱ्या विड्यांकरिता सुद्धा काही लोक पानं न्यायला येत.

गोव्यातील नारळाची झाडे म्हणजे उंचच उंच असतात. दादांच्या झाडांचे नारळ उत्तम प्रकारचे आहेत हे ते जाणून होतेच. मग चांगल्या प्रकारचे नारळ इतरांच्या घरीही असणे महत्त्वाचे असे त्यांचे विचार. हे विचार प्रत्यक्षात आणण्याकरिता ते बरेच कष्ट करीत. उंच झाडावरून नारळ खाली पडल्यास एखाद वेळ फुटतो किंवा दुखावला जातो. म्हणून दादा पक्के झालेले नारळ झाडावरून जमिनीवर न टाकता, पाठीला झोळीत घालून किंवा दोरीला अलगद बांधून खाली घेत आणि ते खायला न वापरता जमिनीत गाडून त्यांची रोपटी काढायचे त्याला 'कवाथे' म्हणतात. नारळाला (जमिनीतील) दोन तीन पाने आली की तो कवाथा दुसरीकडे लावण्यास योग्य होई. असे नारळाचे कवाथे दादांकडे सतत असत. दादा घरी आलेल्या पाहुण्यांना, शेजाऱ्यांना वगैरे कवाथे हवेत का ? असं विचारून ते त्यांना देत असत. माडांकरिता जागा असणारी मंडळी लगेच होकार देऊन लागतील तेवढे कवाथे घेऊन जायचे आणि दादांना केवढा आनंद व्हायचा !

अशा ऋषितुल्य दादांच्या घरात मी सून म्हणून आले आणि त्यांचा मोठेपणा अनुभवू शकले हे माझं भाग्य समजते आणि त्यांना मनातून प्रणाम करते. □

# हार्दिक अभिनंदन !



सौ. प्रिया सुनिल भिडे, पुणे यांना नुकताच वनमित्र पुरस्कार प्रदान करण्यात आला. सौ. प्रिया ह्या पेडिॲट्रीन फिजिओथेरपिस्ट असून पुण्यामध्ये काम करत होत्या. २० वर्षे फिजिओथेरपीस्ट म्हणून प्रॅक्टीस करून या क्षेत्रातून निवृत्ती घेतली. त्यानंतर घराच्या गच्चीवर माती न वापरता केवळ कचऱ्याचा वापर करून बाग फुलवता येते हे स्वतः सिद्ध करून दाखविले. ह्यामुळे कचरा व्यवस्थापनाविषयी सुद्धा लोकांमध्ये जागृती करण्यास सुरुवात केली. अनेक संस्था, सोसायट्या, महिला मंडळे व बगीचा वर्गांना कचऱ्यापासून माती निर्माण करण्याचे मार्गदर्शन करतात. ह्यासाठी स्लाईड शोच्या माध्यमातून शहरी जीवनात कचरा व्यवस्थापन कसे केले जाते ह्याविषयी मार्गदर्शन करतात. ह्या सामाजिक बांधिलकीच्या अनुभवातून 'झेप' संस्था स्थापन झाली. आजमितीला ५० मुले व २० शिक्षक ह्यावर कार्य करीत आहेत. सौ. प्रियाताई कचऱ्यापासून निर्मिती करण्यासाठी अनेकांचे प्रेरणास्थान ठरल्या आहेत. अनेक वृत्तपत्रे, मासिके ह्यांमध्ये लेखन करून विविध शहरांमध्ये आकाशवाणी केंद्राद्वारे प्रसार करण्याचे कार्य त्या करीत असतात. भिडे प्रतिष्ठानमध्ये सुद्धा विविध कार्यक्रमांमध्ये सहकार्यासाठी नेहमीच सक्रिय असतात. भिडे प्रतिष्ठानकडून त्यांना भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा !



# सर्व गणेश भक्तांसाठी सुवर्णसंधी !

## श्री गणेश कला केंद्र



आमचे येथे १०० टक्के शाडूमातीच्या, शास्त्रशुद्ध गणेश मूर्ती उपलब्ध आहेत. आपला गणेशोत्सव पर्यावरणपूरक आणि शास्त्रशुद्ध साजरा करण्यासाठी गणेशमूर्तींची मागणी आजच नोंदवा.

**श्री. आदित्य सतीश भिडे**

**स्थानिक संपर्क : ८८०५० २६६३०, ७५८८० २३६१६**

गुरुप्रसाद, श्री स्वामी समर्थ सोसा. घर क्र. १४, श्रीधरनगर, धनकवडी, पुणे - ४३.
१६९७, सदाशिव पेठ, खजिना विहीर चौक, पुणे - ४११ ०३०

## *Satish Bhide*

**Investment Consultants, Estate Agent, Financial & Placement Services**

Ph. (0)020-2447 2316, R 24354353 Mob. : 98220 48661 E-Mail : bhidesatish@yahoo.co.in

## Savita Bhide & Co.

**Our Times Is Yours ! Call on us for :**

***Insurance *Mutual Funds/Loans/Company Deposits & Bonds *Sales/Purchase of Flat/Offices/Plots *Computation of I-Tax *Filling of I-Tax Return**

1697, Sadashiv Peth, Khajina Vihir Chowk,
Near Shailesh Raswanti Gruha, Pune 30.

# मॅरेथॉन : एक अविस्मरणीय अनुभव

- सौ. अस्मिता भिडे, ठाणे
मो. ९९६७०५८४७२

जुलै महिना होता. ऑफिसमधील अभिषेक २१ कि.मी. अर्धमॅरेथॉनचे सांगत आला आणि आम्हा सर्वांना भाग घेण्यासाठी प्रोत्साहित करू लागला. मुंबईतील स्टँडर्ड चार्टर्ड मॅरेथॉन ही एक प्रतिष्ठित मॅरेथॉन शर्यत आहे. आधी वाटले आपला काय संबंध ? पण बाकी ऑफिस ग्रुप असल्यामुळे नोंदणी करण्याचे ठरले. मॅरेथॉन जानेवारी महिन्यात होती आणि नोव्हेंबर महिना आला तरी तयारीला काहीच सुरुवात नव्हती. सुरुवातीला २० मिनीटे रोज चालायला सुरुवात केली. पण बाकीच्यांचे अनुभव ऐकता वेळ वाढवत नेणे गरजेचे आहे हे लक्षात आले. मग मात्र जमेल तसे रोज चालणे चालू केले. अनुभवी लोकांकडून अनेक टिप्स मिळत होत्या. त्यात महत्त्वाचे होते बूट. मग चांगल्या प्रतीच्या बुटांची उत्साहाने खरेदी झाली आणि नवीन बुटांमध्ये सराव सुरू झाला. होता होता मॅरेथॉन दोन दिवसांवर येऊन ठेपली. मॅरेथॉन किट मिळाले. त्यात बिब व इतर अनेक वस्तू होत्या. ह्या स्पर्धेचे काही नियम असतात. प्रत्येक स्पर्धकाला एक बिब म्हणजे नंबर असलेला मोठा बॅच मिळतो. त्या बिबमध्ये एक चिप असते. ठरलेल्या टप्प्यावर त्यात टाइम रेकॉर्ड केला जातो. कोणीही स्पर्धक शॉर्टकट मारू शकत नाही. एखादा टप्पा चुकल्यास स्पर्धक बाद होतो. मॅरेथॉन बांद्र्यापासून सुरू होणार होती. नाही म्हटले तरी सर्व बाजूंनी दडपण येत होते. माझे दिशाज्ञान यथातथाच असल्यामुळे नवऱ्याने मॅरेथॉन मार्गाचा पूर्ण नकाशा समजावून दिला.



अखेर शर्यतीचा दिवस उजाडला. रात्रभर झोप आली नाही. साडेपाचला सर्वजण जमलो. स्पर्धेच्या ठिकाणी खूप उत्साहाचे वातावरण होते. जॉन अब्राहमने फ्लॅग केले आणि शर्यतीला सुरुवात झाली. शर्यत सुरू झाली तेव्हा हवा सुखद गार होती. शर्यतीचा पहिला टप्पा बांद्रे-वरळी सी-लिंकवर होता. समुद्रावरील हा पूल खूपच सुंदर आहे. पण भर समुद्रात असल्यामुळे गार वारे वाहत होते. यामुळे पायात गोळे येऊ लागले व वेगही मंदावला. शर्यत पूर्ण होईल की नाही अशी शंका येऊ लागली. पण थोड्यावेळाने नेटाने चालू लागले. आजूबाजूने लोकांचे जथ्थेच्या जथ्थे जात होते. काही उत्तम तयारीने आले होते तर काही जण टाइमपास म्हणून आले होते. एक एक किलोमिटरवर अंतराचे फलक होते. रस्त्यात अनेक लोक पाणी, एनर्जी ड्रिंक, लिंबू गोळ्या, संत्री वगैरे घेऊन उभे होते आणि स्पर्धकांना प्रोत्साहित करत होते. एक एक किलोमिटर कमी झाल्यावर हुरूप वाढत होता. स्पर्धा पूर्ण करणार याचा विश्वास वाटू लागला आणि शेवटचा टप्पा आला. शेवटचे अंतर कापून मैदानात प्रवेश केल्यावर आनंद गगनात मावेना. २१ कि.मी. इतके अंतर आपण पार केले यावर विश्वासच बसत नव्हता. पाय सोलवटून निघाले होते, पण आनंद ओसंडून वाहत होता. मेडल आणि रिफ्रेशमेंटस् घेऊन आनंदाने टेकले. मग मेडल घालून थोडे फोटो काढले. घरातील लोकांना प्रचंड कौतुक वाटले. संध्याकाळी घरी फोनवर आणि व्हॉटस्ॲपवर शुभेच्छांचा पाऊस पडला. ही मॅरेथॉन अविस्मरणिय तर झालीच पण सुप्त असलेल्या शारीरिक क्षमतेची जाणीव करून गेली.

श्री. अरुण भिडे, पुणे यांना प्रतिष्ठानच्या वैद्यकीय मदत निधीमधून रु. ५००० त्यांच्या शस्त्रक्रीयेसाठी देण्यात आले.

# नैसर्गिक औषधे : काळाची गरज

## (श्री. धनंजय भिडे यांनी तयार केलेल्या औषधांची थोडक्यात माहिती)

– **श्री. धनंजय भिडे**, पुणे
मो. ९८२३१६२१५२

**सर्वेऽ सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात्॥**

पूर्वाच्या काळात मनुष्य निसर्गाच्याच सान्निध्यात राहत असल्याने सर्वसाधारणपणे निरोगी व त्यामुळेच सुखी होता. लहानमोठ्या सर्व आजारांवर आजूबाजूला असलेल्या झाडपाल्यांचे गुणधर्म जाऊन उपाय केला जाई आणि मजा अशी की तो नैसर्गिक उपचारांनी लगेच बराही होत असे. आज आपण निसर्गापासून दूर गेलो आणि अनेक शारीरिक व मानसिक व्याधींना जवळ केले. पुन्हा आपण निसर्गाशी जवळीक केली तर तो आपणास नक्कीच निराश करीत नाही हा अनुभव आहे. अशाच विचारांतून मी नैसर्गिक वनस्पती तेलांपासून औषधांची निर्मिती केली आहे.

पुदिना, तुळस, निलगिरी, हळद इत्यादी वनस्पतींच्या तेलांच्या गुणधर्माचा शास्त्रीय अभ्यास केला. वेगवेगळ्या प्रमाणात तेलांचे मिश्रण करून अनेक चाचण्या घेतल्या आणि त्यांचे अतिशय विलक्षण परिणाम दिसून आले. यातूनच सिनुगो रोल ऑन, डीबी कंठसुधा, डीबी लिनिमेन्ट आणि ओरन्गो ड्रॉप्स इत्यादी औषधे निर्मिती झाली.

मी स्वतः गेली २५ वर्षे औषधनिर्माण क्षेत्रात कार्यरत आहे. ॲलोपॅथीच्या क्षेत्रात काम करताना, सर्रासपणे वापरण्यात येणाऱ्या ॲन्टीबायोटिक्समुळे भविष्यकाळात निर्माण होणारे धोके मला सतत जाणवत होते. या धोक्यांना थोपविण्यासाठी पूर्णपणे नैसर्गिक तेलांपासून औषधांची निर्मिती करण्याची कल्पना सुचली. सतत चार वर्षे वनस्पतींचा शास्त्रीय पद्धतीने चिकित्सक अभ्यास करून नमुन्यासाठी अगदी लहान प्रमाणात औषधे तयार केली आणि सुरुवातीला प्रयोगादाखल घरातीलच व्यक्तींवर या औषधांच्या चाचण्या घेतल्या. त्यांचे चांगले परिणाम दिसून आले. खात्री झाल्यावर आजूबाजूच्या लोकांना, नातेवाईकांना औषधे वापरण्यास सांगितले. त्यांनाही उत्तम अनुभव आले. उदाहरणादाखल दोनच अनुभव सांगतो.

वेदमूर्ती श्री. धायगुडे शास्त्री (वय ८४, पुणे) यांना बरेच दिवस गुडघेदुखीचा त्रास होता. पायावर सूज होती. त्यांना लिनिमेन्टचा विलक्षण परिणाम जाणवला. सतत ४ दिवस लावल्याने पायावरील सूज निम्म्याहून कमी झाली. पुढे महिनाभर वापरल्यावर आता सूज बरी होऊन त्यांना चालणे-फिरणे सुसह्य झाले.

माझ्या कंपनीतील एक वरिष्ठ अधिकारी बॉम्बे फ्लूने आजारी होते. ॲन्टिबायोटिक्स औषधे घेऊनही त्यांना बरेच दिवस गुण येत नव्हता. त्यांनी फक्त ३ दिवस सिनुगो वापरले आणि बरे होऊन कामाला येऊ लागले. असे शेकडो अनुभव घेतल्यानंतर प्रयोगशाळेत मी या औषधांच्या विश्लेषण चाचण्या (**analytical tests**) घेतल्या. त्यांची गुणवत्ता सिद्ध झाल्यावर आता मोठ्या प्रमाणावर याची निर्मिती सुरू केली आहे. आता सर्वसामान्य लोकच नव्ह तर ॲलोपॅथी, आयुर्वेदिक डॉक्टर्ससुद्धा स्वतः ही औषधे वापरतात व आपल्या रुग्णांना ती वापरण्याचा सल्ला देतात.

आजपर्यंत केलेल्या परिश्रमांचे सार्थक झाले याचे मला मनोमन समाधान वाटते.

सिनुगो – सर्दी व सायनससाठी
डीबी कंठसुधा – घसादुखी, खोकला यासाठी
डीबी लिनिमेन्ट – सांधेदुखी
ओरॅन्गो – तोंडातील जंतुसंसर्ग व दातदुखी

# भावपूर्ण श्रद्धांजली !

मा. श्री. दिलीप भिडे आणि मा. श्री. सुनिल भिडे यांना सादर प्रणाम !

आपण उभयता नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान तर्फे २२ ऑगस्ट रोजी झालेल्या माझ्या पतीच्या निधनाबद्दल आमच्या अत्यंत दुःखद प्रसंगाचे वेळी आमच्या दुःखात सहभागी होऊन आमचे सांत्वन केलेत. आपल्या सर्वांच्या सहभागाने मग हळूहळू दुःखातून बाहेर येण्यास मदत होईल असे वाटते.

देवाने आणि दैवाने आमच्या दोघांचे संसारात सुखाचे मापच जास्त उधळलंय. त्यामुळे प्रथमच आलेल्या माझ्या आयुष्यातील ह्या भळभळत्या दुःखातून कसे वर यावे तेच कळत नाही. आमच्या घरातील सर्वांवरच हे दुःख कोसळलेय. मला त्यातल्या त्यात मुलगे, सुना, जावई, मुलगी आधाराला आहेत.

माझ्या कलागुणाबद्दल भिडे कुलातर्फे मिळालेल्या कला-गौरव पुरस्कारामुळे सर्वांना माझी माहिती कळली.

कै. वा. भि. भिडे ह्यांचेही तितकेच बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. घर संसारातातील आपल्या जबाबदाऱ्या व्यवस्थितपणे कर्तव्यदक्षतेने पार पाडून सर्व कलागुणांमध्ये त्यांनी सुद्धा आपला ठसा उमटविला आहे. त्यांची सर्वबाबतीत सुयोग्य साथ मिळाल्यामुळेच मलाही



आपले कलागुण वाढविण्यास, जोपासण्यास संधी मिळाली. अर्थात देवाची आणि दैवाचीही आम्हा उभयतांवर पाखर असावी. आयुष्यातील सारे क्षण न् क्षण उभयतांच्या सान्निध्यात ! पैसा, मान, धन ह्यांना आम्ही उभयतांनी दुय्यम स्थान दिले. माणूस धन महत्त्वाचे मानले. त्यामुळे ९०० रु. पगारावरही आम्ही ७ जणांच्या एकत्र कुटुंबात (सासू, सासरे, दीर, आम्ही दोघ व आमची ३ मुलं) आता इतकेच आनंदात होतो. जुन्या ओल आलेल्या भिंतींच्या पेशवेकालीन वाड्यात चार इतर भाडेकरूंबरोबर आम्ही राहत होतो. तिथेही सर्व आम्हा भाडेकरूंमध्ये दाट मैत्री झाली, उलट वाड्यातील जिव्हाळा काही वेगळाच असतो हे आम्ही अनुभवले. अत्यंत शिस्तीचे, किंचित दरारा वाटणारे वेळच्या वेळी ठरल्याप्रमाणे कामे करून वेळेचे महत्त्व जपणारे, प्रत्येक वस्तू जागच्या जागी ठेवून स्वतःची कामे स्वतःच करायचे. अत्यंत श्रद्धाळू, देवाधर्माचा अभिमान असणारे ! राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते होते. इथेही संघ शाखेत जास्त परोपकारी वृत्तीचे, समाजाचेही आपण काही देणे लागतो ह्या वृत्तीने समाजकार्य करणारे, परोपकारी वृत्तीचे होते तसेच अत्यंत कर्तव्यदक्ष. आपल्या कर्तृत्वाने रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट (ए.आर.डी.ई.) येथे कार्यरत होते. पहिली रायफल बनविण्याचे श्रेय ह्यांना आहे. ह्या खात्यात स्वतःला झोकून देऊन तेथील डायरेक्टर पदापर्यंत पोहोचले. स्व. माधव भिडे ह्यांचे निधनाचे वृत्त सध्याचे (ए.आर.डी.आय.) चे डायरेक्टर डॉ. राजन ह्यांनी आमचा मुलगा चि. संजय भिडे, मेजर जनरल (निवृत्त) ह्यांना पाठविलेले सांत्वन पत्र पुढे देत आहे. या पत्रात प्रसिद्धीसाठी मजकूर देण्याबरोबरच माझा पुत्र संजय व स्नुषा सुषमा ह्यांनी ह्यांच्या शेवटच्या आजारात आणि त्यांच्या पश्चात मला सांभाळण्यासाठी केलेल्या मायेला शब्द अपुरे पडतील. आजकाल सगळीकडे वृद्धांची हेळसांड पाहिली की असा सुपुत्र आणि सून मिळणे म्हणजे देवाची देवाची देणगीच आहे. त्यांच्या कामांचा गौरव करणारे पत्र सध्याचे डायरेक्टर श्री. राजन ह्यांनी पाठविलेले पत्र देण्याचे कारण म्हणजे ए.आर.डी.ई. मधून निवृत्त होऊन जवळजवळ ३५ वर्षे होऊन सुद्धा एक कर्तव्यदक्ष आणि हुषार व्यक्ती म्हणून इतक्या वर्षांनंतर त्यांचा नावलौकिक अजूनही आहे.

***

**Dear Shri S. V. Bhide**

It is with a heavy heart that we express our sorrow at the demise of Shri V. V. Bhide veteran scientist of ARDE.

We revere Shri V. V. Bhide as one of the pioneers of small arms developed at ARDE. His contribution towards the Design of (small arms developed) 7.62 mm Pashan light Rifle provided invaluable experience in small arms domain. The competence thus builtup laid the foundation for ARDE's success in small arms design and development in the later years. We pray homage to his memory and pray that his soul may rest in peace. Sir may you and your family have the strength to face this irrepairable loss.

Sincerely yours
**K. M. Rajan**
(Director ARDE)

**वामन विश्वनाथ भिडे यांची थोडक्यात माहिती**

जन्मस्थान : केळवडे येथे. शिक्षण : बी.एस्सी.,

साडेतीन वर्षांचा कोर्स दारुगोळा कारखान्यात खडकी येथे. घरसंसार व्यवस्थित सांभाळण्याबरोबर अनेक कलागुण जोपासले. नाटकांतून कामे करणे, हौशी नाट्य क्लब स्थापणे, राज्य सरकारतर्फे होणाऱ्या स्पर्धांतून भाग घेणे, ३ वर्षे आमच्या नाटकांना प्रथम पारितोषिक मिळाले. टागोर सेंटर निमित्त बंगाली लोकांच्या आग्रहास्तव काबुलीवाला हे नाटक बसविले. स्वतः वा. वि. भिडे ह्यांनी काबुलीवाल्याचे काम करून १००० बंगाली लोकांसमोर सादर केले. तसेच बॅडमिंटन खेळामध्ये प्राविण्य. अनेक पारितोषिके.

⁕ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पहिल्यापासून स्वयंसेवक. कर्वेनगर, पुणे येथे उल्लेखनीय संघकार्य.

⁕ आपणही समाजाचे काही देणे लागतो ह्या दृष्टिकोनातून आपल्या आर्थिक उत्पन्नामधून समाजातील अनेक संस्थांना देणगी.

⁕ रिटायर्ड झाल्यानंतर कै. अप्पा पेंडसे ज्ञानप्रबोधिनी ह्यांनी विजापूर येथे खेड्यातील लोकांसाठी निर्माण केलेल्या कारखान्यात ८ वर्षे विनामूल्य कार्य.

⁕ त्यानंतर ७ वर्षे कर्वेनगर येथील गरीब मुलांसाठी सुरू झालेल्या शाळेत सेक्रेटरी म्हणून कार्य. तिथे मुलांना गीता शिकवली.

आपल्या मिळकतीमधून मिळवायला लागल्या पासूनच थोडी आर्थिक मदत समाजातील अनाथ, अपंगांना करीत असत. तसेच शाळा केळवडे येथील भिडे गणेश कुलमंदिर, भिडे प्रतिष्ठान, देवधर ट्रस्ट व अनेक सामाजिक कार्यासाठी देणग्या दिल्या.

**वा. वि. भिडे यांच्या सर्व्हिसमधील यशा बद्दल -**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने 'रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट' हे नवे खाते उघडले. (ए.आर.डी.ई. आर्मामेंट रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट सेंटर)

प्रथम अंबरनाथ येथे ७ वर्षे, नंतर पुण्यात पाषाण येथे काम करताना निरलसपणे झोकून देऊन कार्य करणे ह्या गुणामुळे इथेही सिनियर सायंटिफिक ऑफिसर म्हणून रुजू होऊन निवृत्त होण्याच्या वेळपर्यंत डायरेक्टर पदापर्यंत पोहोचले. शस्त्र संशोधनातील पहिली रायफल बनविण्याचे श्रेय ह्यांचेकडे जाते. त्यासाठी राजस्थान, लेह, लडाख येथेही ट्रायल्ससाठी जावे लागे.

आपली स्नेहेच्छु
सुमती भिडे

**व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठीही तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिक दृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा.**

# सहवेदना

सांगलीतील कारखानदार भिडे घराण्यातील ज्येष्ठ व्यक्ती, जुन्या पिढीतील उद्योजक श्री. प्रभाकर रामचंद्र भिडे यांचे वयाच्या ९०व्या वर्षी वृद्धापकाळाने माधवनगर येथे दि. २८-११-२०१६ रोजी दुःखद निधन झाले.

तरुण वयात भिडे ॲण्ड सन्स, भिडे यंत्र लोह वस्तू केंद्र, विनायक विव्हिंग मिल्स इत्यादी संस्थांचे संस्थापक, आपले वडील कै. रामभाऊ भिडे यांचा प्रदीर्घ सहवास त्यांना लाभल्याने भिडे घराण्याची जडणघडण, तसचे घराण्यातील लहानथोर व्यक्तींची जडणघडणही



त्यांनी पाहिली होती किंवा ऐकली होती. सांगलीतील अनेक संस्था व व्यक्तींचा इतिहास त्यांना पाठ होता. सामाजिक कामाची आवड असल्याने सांगली अर्बन को-ऑप. बँक, सांगली शिक्षण संस्था यांवर त्यांनी संचालक म्हणून अनेक वर्षे काम केले होते. माधवनगर येथील आरोग्य केंद्राचे ते संस्थापक संचालक म्हणून बरीच वर्षे काम पाहत असत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते बालपणापासून ते शेवटपर्यंत स्वयंसेवक राहिले. माधवनगरचे जुने रेल्वे स्टेशन घरासमोरच असल्याने संघाचे मा. गोळवलकरगुरुजी, अटलबिहारी वाजपेयी यांच्यापासून अनेक ज्येष्ठ कार्यकर्ते पहाटे रेल्वे स्टेशनवर उतरल्यावर प्रभाकरपंतांकडे पहिला चहा घेऊनच पुढे सांगलीस जात असत.

भिडे प्रतिष्ठानचे कामकाजाकडे त्यांचे बारीक लक्ष असे. मी प्रतिष्ठानचे सांगली-मिरजेचे काम पाहत होतो व त्यामुळे सांगली-मिरजेतील ६०-७० भिडे कुटुंबांना भेटतो याचे त्यांना फार कौतुक वाटे.

सर्व भिडे कुटुंबीयांप्रमाणे ते ही सावरकर भक्त होते. सावरकरांची अनेक भाषणे त्यांना तोंडपाठ होती. सांगलीच्या कारखानदार भिडे घराण्याचा चालता-बोलता इतिहासच आमचेतून गेला आहे. त्यांचे पश्चात पत्नी, दोन मुलगे, एक मुलगी, सुना नातवंडे, पणतू असा परिवार आहे. त्यांचे दुःखात प्रतिष्ठानचे सर्व सभासद सहभागी आहेत.

– **कुमार भिडे**, अध्यक्ष
नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठान

## नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठानला आपली जाहिरात/बॅनर्स देऊन आर्थिक सहकार्य करणारे मान्यवर

१) भिडे ॲण्ड सन्स, सांगली
२) भिडे यंत्र लोह उद्योग, सांगली
३) आर. जी. ज्वेलर्स, सातारा
४) कनक एन्टरप्राईजेस, डोंबिवली
५) पंडित आजगांवकर असोसिएटस्, पुणे
६) शशिताई घुले (भिडे) परिवार, पुणे
७) मंगलम् ट्रेडिंग कंपनी, पुणे
८) के. सी. भिडे, पुणे
९) सत्यम् एन्टरप्राईजेस, पुणे
१०) सप्तशती ज्वलेर्स, डोंबिवली
११) जनता सहकारी बँक लि., पुणे (रंगीत)
१२) अभिरुची (भिडे बाग), पुणे (रंगीत)
१३) सविता भिडे, पुणे
१४) श्री गणेश कला केंद्र, पुणे
१५) ठाणे जनता सहकारी बँक, पुणे
१६) गोवा सांस्कृतिक २०१६, गोवा
१७) निकिता बॉयलर्स, नाशिक (रंगीत)
१८) कोंकणी अभ्यास कोश, गोवा
१९) मेसर्स सूर्य शिबिर, पुणे (मिलींद भिडे) (बॅनर)
२०) अभिरुची भिडे (बाग), पुणे (बॅनर)
२१) सुनिल भिडे

*With Best Cpmpliments From.....*

Schneider Electric

# Satyam Enterprises

**Official Distributors of Schneider Electric**

*****

1934, Sadashiv Peth, Madiwale Colony,
**Pune - 411 030.**
**Phone :** 020-2445 1235, 2446 6139
**Website :** satyampune.com

*For*

• visiting Cards • Flyers • Brochures • Book Printing

Visit Our Site

Art & PrintShop.com

www.artandprintshop.com

**A K. C. Bhide**

Block Makers Brand

1977, Sadashiv Peth, Madiwale Colony, **Pune-411 030.,** India.
**Phone :** +919371028412, 9422303800

# माझी पहिली इनिंग !

- दिलीप वासुदेव भिडे, पुणे
मो. ९६५७५४१२३६

बघता बघता फोर्स मोटर्ससारख्या नामांकित कंपनीत ३४ वर्षे नोकरीची केव्हाच निघून गेली. वर्ष, महिन्यांचे गणित दिवसांवर आले आणि २४ डिसेंबर निवृत्तीचा दिवस येऊन ठेपला. वास्तविक चाकोरीतील नोकरी संपल्यानंतर मनाला आनंद होतो, परंतु कधी कधी एवढे वर्ष आपल्या सान्निध्यात येणारे अनेकांचे सुख, दुःखात साथ देणारे, दररोज भेटणारे सहकारी, वरिष्ठ, माझे टेबल, खुर्ची, संगणक इत्यादी मला दररोज भेटणार नाहीत ही खंत वाटते. परंतु निवृत्ती मात्र अटळ असते.



साठ वयानंतर आपले छंद जोपासण्यासाठी, चाकोरी सोडून कुठेतरी थांबायला हवे. म्हणून ज्युलियन म्हणतात ते खरं आहे. 'यद् रोचते तद् ग्राह्यम, यद् न रोचते तद त्याज्यम्' जे आवडेल ते स्वीकारा, जे आवडणार नाही ते सोडून द्या. आज मला नोकरीतून मुक्त झालो, मोकळा झालो असे वाटत असले तरी माणूस मोकळा आणि निश्चिंत कधीच होत नाही. नोकरीत असताना सुद्धा सामाजिक बांधिलकीच्या नात्याने समाजाला आपला उपयोग झाला पाहिजे ह्या हेतूने प्रेरित होऊन अशा संस्थांमध्ये आपलाही खारीचा वाटा असावा म्हणून कामे करीत होतो. ह्यापुढेही ईश्वराने आरोग्य सांभाळावे आणि आपल्यासारख्यांची पाठराखण असेल तर भविष्यात सुद्धा करेन.

वास्तविक लहानपणापासून सैन्यामध्ये किंवा पोलीस यंत्रणेमध्ये मनापासून नोकरी करायची होती. ह्याप्रमाणे तशी संधी पण आली होती. परंतु पुरेसे आर्थिक बळ मिळण्यास उशीर झाला तोपर्यंत ती संधी हातातून निघून गेली ती पुन्हा कधीही न येण्यासाठी. असो. तरी सुद्धा तक्रार नाही, खंत नाही, पूर्तीसाठी प्रवास असतो, कधीतरी मिटण्यासाठीच, काळजामधला श्वास असतो नोकरीत काम करीत असताना सुद्धा नोकरीतली आव्हाने, ताण, शाबासकी, बक्षीसे, वृत्तपत्रात लेखन अशा अनेक गोष्टी सांभाळत होतो. कंपनी मोठी आणि नामांकित असल्यामुळे बंद होण्याची भीती कधीच नव्हती. तरीसुद्धा काही वेळा नोकरी सोडून दुसरे काहीतरी सुरू करावे असेही वाटत असे. परंतु जबाबदारीच्या दृष्टीने प्रत्येक वेळी, सुख-दुःखात माझी साथ देणारी माझी पत्नी सौ. वर्षा नेहमी धीर देत असे. सुरुवातीला पगार कमी असताना सुद्धा जशी तिची साथ होती त्याचप्रमाणे आजमितीला सुद्धा तशीच आहे. त्यामुळेच नोकरी सांभाळून इतर सामाजिक बांधिलकी सांभाळू शकलो. चाकोरीबद्ध नोकरी संपल्यानंतर आपण काय करायचे, कुठे गुंतायचे, ह्याची सवय मी नोकरीत असतानाच केली आहे.

भिडे प्रतिष्ठान, चित्पावन संघ, भाजप, सार्वजनिक गणेशोत्सव इत्यादी ठिकाणी काम केल्यामुळे सामाजिक भान, सहनशक्ती ह्याची जाण आली. ह्याठिकाणी स्व. दामोदर (दामुकाका भिडे) आणि माझे कंपनीतील सहकारी श्री. प्रभाकर आडकर ह्यांचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. डोक्यवर बर्फ आणि तोंडात साखर ठेवायची आणि सद्सद्विवेक बुद्धीने आपले काम करायचे हे दामुकाकांनी सर्वप्रथम सांगितले. तसेच फोर्स मोटर्स मधील सहकारी श्री. आडेकर यांनी वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत नोकरी करायची आणि कोणीही वरिष्ठांनी काम सांगितले तरी तत्काळ, तोंडावर नाही म्हणायचे नाही. असे उत्तम मार्गदर्शन मिळाले. तरीसुद्धा अजूनही कधी कधी डोक्यावरचा बर्फ चुकून खाली पडतो आणि साखर विरघळून जाते. सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी निवृत्ती नाही कारण त्यातच आनंद आहे. मुजतर अकबराबादी म्हणतात,

सितारों से ऊँचा हो रुतबा तुम्हारा
बनो तुम हरेक जिंदगीका सहारा
तुम्हें जिसकी हसरत है मिल जाए तुमको
समझ लो हमारी दुवा का इशारा




With Best Comliments From :

# MARS
## TEXTURES

Painting & Textures Contractors

**Ajit Bhide** Mo.: 98220 53231
**Shreekant Ranbhor** Mo.: 94223 09380

Office : Bld. No.2, Flat No. 2,
Daulat Co-op. Soc., Karishma Square,
Karve Road, Pune - 411038

Telefax : 020-25442013
email : marstextures23@rediffmail.com

**स्वागत !** जानेवारी म्हणजे हेमंत ऋतू. पूर्णत्वाचा ऋतू. गर्द पिवळ्या शेतातून तरारलेल्या गव्हाच्या लोंब्यांतून, ज्वारीच्या मोत्यांच्या कणसांतून, धरती भरभरून देते. असा हा हेमंत ऋतू आणि जानेवारी मध्येच गोवा येथे भिडे कुल संमेलन संपन्न होत आहे. त्या निमित्ताने लिहिलेले गीत ...

पूर्णत्व पूर्णमिदं, सुखद हेमंत ऋतू येत,
गर्द पिवळ्या शेतातून डुलताती नवांकुर ।।१।।
वर्धापन दिन आज, स्वागत तुमचे करीत ।।धृ०।।
जेष्ठांप्रती आदरभाव, विद्यार्थी गुणगौरव,
भिडे कुल परिवारा, सुखद आज सोहळा ।।२।।
स्वागतास आपुल्या, तोरणे उभारली,
दारी सुबक काढली, रेखीव रंगावली ।।३।।
चमकती, झळकती लाल, निळ्या दीपमाळा,
उपस्थित सुहृदांनो, स्वागतास स्वीकारा।।४।।
रिझविण्यास आपणा, मधुर गीत गायना,
तसेच अति रुचिर, स्वादिष्ट सहभोजना ।।५।।
निरपेक्ष, निरागस स्नेहबंध दृढ करू,
भिडे कुलवासियांचे, एक घरकुल करू ।।६।।
पुन्हा सुमती करिते, स्वागतम् सुस्वागतम्।।

– श्रीमती सुमती वा. भिडे, पुणे
फोन : ०२०-२५४४११६१

# भरारी

शब्दांकन - दिलीप भिडे,
पुणे.

**मुश्कील नहीं है कुछ दुनिया में**
**तू जरा हिम्मत तो कर।**
**ख्वाब बदलेंगे हकीकत में,**
**तू जरा कोशिश तो कर।**



निवृत्तीनंतर सर्वसाधारणपणे लोक एकाकी बनतात. पण त्यांच्यातील विविध गुणांमुळे ते लोकांना निवृत्तीनंतरही हवेहवेसे वाटतात. असेच एक दांपत्य पुण्यात वास्तव्यास आहे, ते म्हणजे श्री. प्रसन्नकुमार मोरेश्वर आणि त्यांची अर्धांगिनी सौ. प्रिती भिडे. हे केळवडे शाखेतील ११ व्या पिढीतील आहेत. श्री. प्रसन्नकुमार बी.कॉम. झाल्यावर १९८१ मध्ये सी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर आय.सी.डब्ल्यू.ए. करून सेंट्रल एक्साईज अॅण्ड कस्टमचा डिप्लोमा केला. १९८२ मध्ये टेल्को म्हणजे सध्याची टाटा मोटर्समध्ये रुजू झाले. २००९ पर्यंत कंपनीच्या फायनान्स खात्यामध्ये आपल्या बुद्धिच्या जोरावर विविध पदांवरून बढती मिळवली. २००९-१४ ह्या काळामध्ये टाटा ऑटोकॉममध्ये चिफ इंटरनल ऑडिटर म्हणून काम केले आणि ह्या काळात पुणे ऑडिट चिफ ह्या संस्थेमध्ये ऑननरी ट्रेझररर्स म्हणून कार्यरत होते. त्यानंतर टाटा मोटर्समध्ये २०१५ पर्यंत अॅक्वाटुल्स आणि फायनान्समध्ये व्हाईस प्रेसिडेंट ह्या पदावर असताना २०१५ मध्ये स्वेच्छा निवृत्ती पत्करली.

निवृत्तीनंतर सुद्धा महत्त्वाकांक्षी माणसे स्वस्थ बसत नाहीत. त्यांना इतर क्षेत्रे खुणावत असतात. म्हणूनच की काय नोकरीनंतर आपले छंद जोपासायला सुरुवात केली. ज्योतिषाची आवड लहानपणापासून होती. त्या अनुषंगाने ज्योतिष विशारद व त्यानंतर ज्योतिष भास्करही झाले आणि सध्या समुपदेशन करतात. ब्रीज सुद्धा खेळतात आणि टाटा मोटर्समध्ये असताना राष्ट्रीय स्तरावर अनेक पारितोषिके मिळवली. सध्या महाराष्ट्र ब्रीज असोसिएशनचे ऑननरी ट्रेझरर म्हणून काम पाहत आहेत. त्याचप्रमाणे कॅरम, बुद्धिबळ, टेबल टेनिस ह्या खेळांची आवड आहे. सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून पुणे रोटरी क्लबचे आजीव सदस्य असून रोटरीच्या माध्यमातून विविध संस्थांना मदतीचा हात निस्वार्थीपणे देत असतात. २०१२-२०१३ ह्या वर्षात अनेक सामाजिक उपक्रम रोटरीच्या माध्यमातून राबविले. त्यामुळे त्या वर्षासाठी विशेष पारितोषिकही त्यांचेच नावावर आहे आणि ह्याच वर्षी लोकमान्य क्लबचे प्रेसिडेंट सुद्धा होते. एवढ्यावरही त्यांची हुन्नरी अजून सुरुच आहे. ऑर्केस्ट्रासारख्या विविध गाण्यांच्या कार्यक्रमांमध्ये उत्तम सूत्रसंचालन करतात. असे हे बहुरंगी व्यक्तिमत्त्व अनेक कला गुणांचा समुच्चय त्यांच्यात झाला असून त्याचा उपयोग समाजासाठीही करतात ही विशेष कौतुकास्पद आहे.

त्यांच्या अर्धांगिनी सुद्धा कमी नाहीत. सप्तपदी करताना पती बरोबर पतीच्या पावलावर पाऊल ठेवून संसार करताना पतीला साथ देत आहेत. माहेरच्या स्वाती जोशी बी.कॉम. जाल्यावर ८१ पासून पुणे कॅन्टोन्मेंट मध्ये नोकरी केली. २१ वर्षे नोकरीनंतर स्वेच्छा निवृत्ती घेतली. परंतु त्यानंतर २००२ पासून योगाकडे वळून 'योग पारंगत ही पदवी मिळवली. योगाचे क्लासेस घेतात. त्यांच्या शिष्यांनी सुद्धा राज्यस्तरावर अनेक पारितोषिके मिळवली आहेत. योग स्पर्धेसाठी सुद्धा अनेक ठिकाणी परीक्षक म्हणून कार्यरत असतात. सेवानिवृत्तीनंतर गाण्याचे प्रशिक्षण सुरू केले. त्यापैकी छोट्या-मोठ्या कार्यक्रमांमध्ये उत्तम आवाज असल्यामुळे थिएटरला होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये उत्कृष्ट (पान ३१ वर पहा)

With Best Compliments From . . .

# PANDIT AJGAONKAR ASSOCIATES

Shrya, S. No. 41/16, Erandwane,
Tarate Colony, PUNE-411004.
Ph. 020-2544 7497 / 2544 7498

हिंदी, मराठी गाणी म्हणतात. परंतु वृद्धाश्रम किंवा सेवाभावी संस्थांमध्ये होणाऱ्या कार्यक्रमांत आपले मानधन सुद्धा स्वीकारत नाहीत. उत्तम कवयित्री आहेत. 'आम्ही भिडे'मध्ये अनेक कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. समाजाचे आपण ऋणी आहोत ह्या भावनेतून रोटरी क्लब तर्फे मागास स्त्रियांसाठी प्रौढ साक्षरता वर्ग घेतले होते म्हणून जिल्हा स्तरावर ह्याचे विशेष कौतुक झाले. २०१३-२०१४ मध्ये रोटरी क्लबच्या सेक्रेटरी म्हणून काम पाहत होत्या. ह्या दांपत्याला दोन मुले असून उच्चशिक्षित आहेत. श्री. प्रसन्नकुमार आणि सौ. प्रिती ह्या बहुआयामी दांपत्याचा निगर्वी स्वभाव, बुद्धिमत्ता, मेहनत आणि मृदुतेने लोकांना आपलेसे करण्याची वृत्ती यांमुळे ज्या ज्या क्षेत्रात गेले तेथे उच्च पदावर नावलौकिक मिळविला. अशा ह्या दांपत्याला भिडे प्रतिष्ठानतर्फे त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा ! □

## शैक्षणिक मदत

भिडे प्रतिष्ठानचे माजी लेखापरिक्षक श्री. विजयराव रघुनाथ आणि त्यांचे बंधू श्री. सुरेशराव रघुनाथ भिडे, ठाणे यांनी आपले आई व वडील स्व. रघुनाथ व्यंकटेश आणि मालती रघुनाथ भिडे, ठाणे यांचे स्मरणार्थ भिडे प्रतिष्ठानकडे शैक्षणिक निधी म्हणून विद्यार्थिनींसाठी प्रत्येकी रोख रु. ११,००० असे एकूण रु. २२,००० दिलेले आहेत. अशा प्रकारे शैक्षणिक निधीसाठी मदत म्हणून दर वर्षी ते देणार आहेत. त्याप्रमाणे यावर्षी गोवा, मुळगांव येथे होणाऱ्या भिडे कुलसंमेलनात ही आर्थिक मदत पुढील विद्यार्थिनींना देण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १) | कु. गौरी दिवाकर भिडे, माभळे | रु. ७,००० |
| २) | कु. लीना अरुण भिडे, पुणे | रु. ५,००० |
| ३) | कु. समिधा मुकुंद भिडे, चिपळूण | रु. ४,००० |
| ४) | कु. रचना श्रीधर भिडे, पुणे | रु. ६,००० |

समस्त भिडे कुलोत्पन्न ज्ञाती बांधवांस सप्तशती ज्वेलर्स तर्फे विशेषतः हे संमेलन यशस्वी व्हावे म्हणून झटणाऱ्या कार्यकर्त्यांना कृतज्ञतापूर्वक शुभेच्छा !
अनेक नामवंत घराण्यांचे सोन्याचे व्यवहार सांभाळणारी, डोंबिवली येथील मध्यवर्ती ठिकाणी असलेली, आत्मीयता, जिव्हाळा व विश्वास जपणारी, आपल्या माणसाच्या व्यवसायाला मदत करावी अशी इच्छा बाळगणाऱ्या सर्व भिडे मंडळींचे अनंत आशीर्वाद लाभलेली पेढी !

**सप्तशती ज्वेलर्स**

अप्रतिम डिझाईन्स व अगणित व्हारायटी

योगेश्वरी देवीची रौप्यमुद्रा ना नफा ना तोटा तत्त्वावर मिळेल.

● आमच्याकडील रिकरींग ठेवीची वैशिष्ट्ये -

✻ रिकरिंग स्कीम योजनेअंतर्गत चेन, पाटल्या, बांगड्या, वेडिंग रिंग या दागिन्यांवर मजुरी आकारली जाणार नाही. ✻ योजनेची रूपरेषा - दरमहा कमीत कमी ५०० रुपये व पुढे त्या पटीत रक्कम ठेवल्यास दोन वर्षांनंतर चार हप्ते जास्त मिळतील. ✻ अधिक माहितीसाठी भेटा अथवा फोन करा ही विनंती.

सर्व प्रकारच्या रत्नांबद्दल साग्रसंगीत माहिती मिळेल.

पत्ता - बी ३/५०७, कस्तुरी प्लाझा, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१.
संपर्क : ०२५१-२८६३५१२, ९२२४५११७५१





भिडे संमेलनास हार्दिक शुभेच्छा !

# आर. जी. ज्वेलर्स

**चोख सोने-चांदी व अद्ययावत दागिन्यांचे दालन**

पंचमुखी प्लाझा, गाळा नं. १, १४९, सदाशिव पेठ,
श्री पंचमुखी गणेश मंदिरासमोर, सातारा
प्रोप्रा. राहुल घाडगे
मो. ९९२२८९९९९८

# ब्रिज या खेळाची माहिती

**कुमार वि. भिडे**, पुणे
मो. ९८२२०८५३८२

ब्रिज हा एकच पत्याचा खेळ असा आहे की त्याला जात, धर्म, देश, स्त्री, पुरुष व वय याचे कोणतेही बंधन नाही. तुम्हाला तेरा पत्ते हातात धरायला येऊ लागल्यापासून अखेरच्या श्वासापर्यंत तुम्ही हा खेळ खेळू शकता. सध्याच्या इंटरनेटच्या जमान्यात तुम्ही रोज कितीही वेळ जगातील कोणत्याही देशातील खेळाडूबरोबर ब्रिज खेळू शकता. त्यातील तीन खेळाडू कोणत्याही देशाचे, धर्माचे, भाषेचे वा लिंगाचे असू शकतात. त्यांची भाषा मात्र एकच असते ती म्हणजे 'ब्रिजची भाषा' !

ब्रिज हा खेळ कोणी शोधला, त्यातील डमी ही संकल्पना कशी आली, गेम, स्लॅम या कल्पना कोणी शोधल्या हे कोणालाच माहीत नाही. मात्र 'व्हिस्ट'या पत्याच्या खेळापासून ब्रिजची सुरुवात झाली असे मानले जाते. लहानपणी तेरा पानी 'कोट' किंवा 'ल्याडीस' खेळत असाल तर ब्रिज ही त्याचीच सुधारलेली आवृत्ती आहे हे लक्षात येईल.

आज आपण जे ब्रिज खेळतो त्याला 'कॉन्टरॅक्ट' ब्रिज असे नाव आहे. त्याची सुरुवात १९२५ च्या हिवाळ्यात, 'हेरॉल्ड व्हॅंडरबिल्ट' याने केली. त्याने ३NT ची गेम १०० मार्कांची, स्लॅम किंवा ग्रॅंडस्लॅम साठी बोनस, व्हलरेबिलीटी, डबल केले तर जादा दंड अशा अनेक गोष्टी सुचविल्या. त्यामुळे कॉन्टरॅक्ट ब्रिजची लोकप्रियता एकदम वाढली व पूर्वी खेळले जात असलेले 'ऑक्शन ब्रिज' बंद झाले.

त्यानंतर 'एली कल्बर्टसन' याने हा खेळ खऱ्या अर्थाने इंटरनॅशनल केला. त्याने एक्का-एक ट्रिक, एक्का व राजा - दोन ट्रीक, राजा व राणी - एक ट्रिक, राजा व एक पान १/२ ट्रिक ही पद्धत वापरून बिडिंग करण्यासाठी तुमच्या हाताचे किंमत (व्हॅल्युएशन) करायला सांगितले. त्यामुळे अडीच ट्रिकला ओपनिंग बिड ३.५ ते ४ ट्रिकला एक नोट्रंप ओपनिंग बिड करणे इत्यादी पद्धती सुचविल्या. त्यामुळे सामान्य व्यक्ती ही चांगले ब्रिज खेळू लागली व त्यामुळे ब्रिजची लोकप्रियता आणखी वाढली.

त्यानंतर आगमन झाले 'मिस्टर ब्रिज' म्हणून ज्यांना सर्व जग ओळखते त्या 'चार्लस गोरेन' यांचे. पेशाने वकील असलेले गोरेन १९३७ चे सुमारास ब्रिज सामन्यात भाग घेऊ लागले व १९४२ साली त्याचे प्रसिद्ध 'कॉन्टरॅक्ट ब्रिज कंप्लिट' हे पुस्तक प्रसिद्ध झाले, त्याच्या १५ आवृत्या व एक कोटी प्रती खपल्या आहेत.

मात्र १९४९ साली प्रसिद्ध झालेल्या 'पॉइंट काऊंट बिडिंग'ने सर्व जगतात खळबळ उडवली. एक्का-४, राजा-३, राणी-२, गुलाम-१ असे मार्क देऊन हाताचे व्हॅल्युएशन करणे, सिंगलयन, डबलटन, टॉपरफ यासाठी ज्यादा मार्क धरणे इत्यादी कल्पनांमुळे ब्रिज खेळणे अतिशय सोपे झाले. ज्याला चाळीस पर्यंत बेरीज करता येते अशी कोणतीही व्यक्ती ब्रिज खेळू लागली. त्याची ही पद्धत 'स्टॅंडर्ड अमेरिकन' म्हणून सर्व जगभर मान्यता पावली आहे.

आजच्या सर्व बिडिंग पद्धती-प्रिसीजन, अकोल, ब्ल्यूक्लब, अगदी आपली के.डी.जोशी सुद्धा याच पॉईंट काऊंट वर आधारलेल्या आहेत.

अलीकडेच इंदूर जवळील एका २००० वस्तीच्या खेड्यातील ३०० पेक्षा जास्त सामान्य लोक रोज ब्रिज खेळतात असे दिसून आले आहे. त्यातील काही लोकांनी इंदूरच्या एका मोठ्या ब्रिज सामन्यात भाग घेऊन चांगले यशही मिळविले. त्यामुळे सुशिक्षित, हुशार लोकच ब्रिज खेळू शकतात असे अजिबात नाही.

ब्रिज हा बुद्धिला चालना देणारा एक पत्यांचा खेळ आहे. हा खेळ खेळणाऱ्या व्यक्ती दीर्घायुष्यी असतात व त्यांना 'अल्झायमर'सारखे विकार कमी होतात असे माझे मित्र डॉ. नाटेकर यांनी एका लेखात सांगितले आहे.

अमेरिका, चीन सारख्या देशात सध्या हा खेळ मुद्दाम शाळांतून शिकविला जातो. तरी पत्ते म्हणजे तीन पानी, रमी, जुगार या कल्पनेतून बाहेर येऊन या खेळाचा आनंद सर्वांनीच घेतला पाहिजे. □

# सामर्थ्य आहे चळवळीचे....!

– मंदार भिडे (माभळे) व सहकारी

तीन महिन्यांपूर्वी शालेय व्हॉटस्‌ॲप ग्रूपमधून आम्ही एकत्र आलो आणि देशातील एक समस्या निवडून कार्य सुरू केले. आज तिसरे वितरण पूर्ण झाले आणि निराधार लोकांच्या प्रतिक्रिया ऐकून बरे वाटले. आधार सोबत ही संस्था लवकरच काही दिवसांत रजिस्टर होत असून कायदेशीर प्रक्रियेचा एक भाग पूर्ण होत आहे.

देशभक्ती म्हणजे काय ? या प्रश्नाचे सोपे उत्तर गांधींनी देऊन ठेवले आहे. समाजातील कोणतीही एक समस्या निवडा आणि काम सुरू करा. प्रश्न मनात आणता काम सुरू करा. डिसेंबर २०१५ मध्ये २५ वर्षांनी १९८९-९० सालच्या चिपळूण युनायटेड इंग्लिश स्कूलची आमची बॅच एकत्र आली,



गप्पा झाल्या, व्हॉटस्‌ॲप ग्रुप बनला, शाळा सोबती म्हणून नंतर जे सर्व ग्रुपवर होते ते आघाने आलेच. त्यातून विचार पुढे आला की आपण काय बंदुका घेऊन लढायला जाऊ शकत नाही, मग काहीतरी देणगी देऊ या. म्हणून ५ ऑक्टोबरला आम्ही 'आधार सोबती' नावाने एका योजनेचा प्रारंभ केला. ही योजना म्हणजे निराधार वृद्धांना दर महिना ५०० रुपयांचा किराणा माल देणे.  हीच योजना अशासाठी की कोकणामध्ये एकरी शेती कुणाची नाही. सगळीकडे गुंठ्याचे मालक. त्यामध्ये १० हिस्सेदार. त्यामुळे शेती हा व्यवसाय नाही. घरातील तरुण मंडळी घराबाहेर कामाला बाहेर पडली. काही तिकडचे झाले अन् काही अधूनमधून सणाला येते-जाते राहिले. मुली गरिबाकडे दिलेल्या. त्यामुळे घरी गावाला हळूहळू वृद्ध निराधार वाटू लागले. एका पेंढ्याने शाकारलेले घरटे, घरात वृद्ध जोडपे ते सुद्धा परतीच्या वाटेला डोळे लावलेले. आळून आळून पोटे खपाटीला गेली. कोणीतरी दरमहा ३०० रुपये पेन्शन चालू केली. गोळाबेरीज काय तर वार्षिक उत्पन्न फक्त दहा हजार. अशी संख्या गावात वाढू लागल्याने आम्ही ही समस्या निवडली.

चिपळूणमधील एक गाव निवडले. स्थानिक पातळीवर एक सुशिक्षित कार्यकर्ता निवडला. त्याच्या मदतीने निराधारांची यादी केली. त्यात २८ लोक वयाच्या ७० पुढील दिसून आले आणि वार्षिक उत्पन्न ५ हजार ते १० हजार. तसेच गावामध्ये १३ विधवा स्त्रिया होत्या की ज्यांचे उत्पन्न महिना हजार रुपये होते. आम्ही सुरुवात निराधार वृद्धांपासून केली. व्हॉटस्‌ॲप ग्रुपमध्ये आवाहन केले. त्यातून ११ जण तयार झाले. त्यांचा वेगळा 'आधार सोबती' ग्रुप तयार केला. एक बँकेचे खाते उघडून त्यात दरमहा आपल्या पगारातून ५०० रुपये जमा करण्याचे ठरले. त्यामध्ये ५ किलो (एकूण) तांदूळ, डाळ, कडधान्ये, तेलाची पिशवी, साबण इत्यादी वाण सामान पॅक केले आणि वाटप केले. सध्या ग्रुपमध्ये २२ जण झालो आहोत. २८ निराधारांना वाटप करायचे आहे. भविष्यात ही योजना चळवळ बनवायची आहे. एक गाव पूर्ण झाले की नंतर दुसरे, तिसरे गाव आणि संस्था अधिकृत करणे इत्यादी कामे पूर्ण करायची आहेत.

आपणांस जर अशा पद्धतीने सेवा करायची असेल तर तुम्ही पण असा ग्रप तयार करून सेवा करू शकता किंवा आमच्यात सुद्धा सामील होऊ शकता.

## घननिळा

मेघांच्या गर्दीने नभ झाले सावळे
पाण्याच्या थेंबानी बनले रम्य तळे।
टंच हिरवाईवर थेंब थेंब नाचती
वरतून दुसरे की प्रतिबिंबच पाहती।
कोवळीक पानांची गर्द हिरवी होतसे
वेलींची लगबग ती पालवी फुटतसे।
ओलेल्या वस्त्राचा शालू बघ तो हिरवा
विरहिणीच्या कंठातून धुंद करी मारवा।
मंद धुंद तो सुगंध, जाई जुई फुलली रे
सायलीने बोट तिचे, हळुवार धरले रे।
सजला हा निसर्ग धरती ही नटली रे
पावसाच्या धारांचा पदर ती सावरे।
नवजीवन संजीवन ऋतु असे पावसाळा
बासरीचे स्वर आळवी सावळा घननिळा।

## सांगेल मला कुणी

जीवनाच्या वाटेवर भेटले कुणी कुणी
सगेसोयरे, आप्त, मित्र आणि मैत्रिणी
दुटप्पी वागणे आणि दुहेरी चेहरे
खरे कोण खोटे कोण सांगेल मला कुणी ?
जरा विश्वास टाकावा, तर पाठीवर घाव व्हावा
संकटात कोणीही पाजत नाही पाणी
तोंडावर गोड शब्द, तर पाठीमागे दूषणे
एकमेकांची फक्त काढतात उणीधुणी
भेटले तसे खरेही, प्रेमळही काही
हृदयाने जोडली म्हटली प्रेमगाणी
कलियुग म्हणे, असेच होत जाणार
स्वार्थीपणात सर्व एकसारखी नाणी
भिंग आहे ज्याच्याकडे, खरे खोटे कळण्याचे
तीच माणसे जगात ठरतात शहाणी

– सौ. प्रिती भिडे, पुणे
९९२२९४४०८२

**माहेरचा मान !**

दरवर्षी भिडे कुलसंमेलनात माहेरवाशिणींचा सन्मान व्हावा या दृष्टीने प्रतिष्ठानच्या जेष्ठ श्रीमती शशीताई मु. घुले, पुणे यांनी पुरस्कृत केलेला **'माहेरचा मान'** यासाठी दिलेल्या **रु. पन्नास हजार** देणगीच्या व्याजातून हा सन्मान करावयाचा आहे. संमेलनामध्ये उपस्थित असणाऱ्या भिडे माहेरवाशिणींमधून याची निवड केली जाईल.

## मॅडम

पक्षांचा सुरू झाला किलबिलाट
आणि गजराची अंगावर आली लाट
परत एकदा डोळ्यांवर ओढली झोपेची रजई
अजून एक पिटुकली डुलकी काढण्यात वेळ जाई
झाला पुन्हा मोबाईलचा गजर
मॅडम झाल्या ओट्यापाशी हजर
चहा घेऊन मनास आली तरतरी
तनास येण्यास उभारी केली वॉकची तयारी
कोवळे ऊन अंगावरी घ्यावे
व्हिटॅमिन डी मस्त वाढवावे
वॉक करताना मनामध्ये असतो 'प्रोजेक्ट'
नाही होणार ह्या वेळी ते नक्कीच 'रिजेक्ट'
देऊन सगळ्यांना हेल्दी टिफीन
मॅडमचे डेस्टीनेशन मात्र असते कॅन्टीन
गर्दीच्या ऐन वेळी घेती थांबूनी भाजी
घरी जाऊन करती मस्त भाजी ताजी
संपली संध्याकाळ झाली रात्र
मॅडम दमून गेल्या मात्र
नजरेत पडता दमलेल्या मॅडम
मदतीस आला त्यांचा ॲडम
नवीन पिढीचा एक गुण छान आहे
मदतीसाठी सर्वांचा हात पुढे आहे

– सौ. कीर्ती नरेंद्र देव, पुणे
मो. ९९७५६१३७१२

## बाहुले आम्ही असे

बाहुल्यांचा खेळ मी पाहून हसलो
एक मी ही त्यातला बाहुला होऊन फसलो
आज माझ्या संगीतला बाहुले अब्जावधी
थोडके नेते खिलाडी, खेळणे त्यांचेच बनलो,
हार-जीती रंगती अन् काटती कोणी कुणा
खेळ असला जीवघेणा, खेळ तो पाहून विटलो
बाहुल्यांची किल्ली त्यांच्या हाती आहे हे खरे
जगत मी आहे बिचारा प्राण ना सोडूही शकलो
कान-डोळे बंद आमुचे, वागवीत आम्हा कसेही
हाल वा हलाल होता, भावना गमवून जगलो
मारूनी मन सर्वदा, काढता वय मीही वठलो,
शाप असला निर्जिवीचा, मी असा भोगीत बसलो

## नको कोसळू रे मेघा

नको कोसळू रे मेघा, नको दगड होऊस
माझी भुकेली लेकरं आणि भरलेली कूस
राग धरून अवकाळी, नको गारांनी मारूस
उद्ध्वसती धान्य फळे, जाईल मातीत कापूस
माझं लेकरू बा द्वाड, त्याचं माणूस हे नांव
बापा रागेजून घालू नको बकोतिधं घाव
नको देऊ कडी शिक्षा, दरडीखाली त्या गाडून
त्यांनी सोसल्येत उन्हं, वारा, वादळे बेफाम
उगा करू नको बाबा अशा शस्त्रांची मिजास
माझ्या मायेच्या कुशीचा, त्यांना मिळो सहवास
माझ्या लेकरांच्या चुका, घेई पोटात घालून
वागण्याची रीत त्यांना, सांगेन मी समजावून

– डॉ. सौ. प्रतिभा भिडे,
ठाणे
९८३३२८४६९०

## चाळीशी

आली आली चाळीशी आली
***Life enjoy*** करायची वेळ जाली
***Relations*** च्या चक्रात अडकलो
आणि स्वत:लाच विसरलो
करू ***Responsibilities*** थोड्या कमी
***Hobbies development*** ची घेऊ हमी
***Passion*** आपली जाणून घ्यावी
वेळीच तिच्याशी मैत्री करावी
***Whatsapp group join*** करू
***Sugar BP*** ला दूर सारू
***Mail*** पेक्षा मंडईतली खरेदी भारी
दुकानदाराशी घासघीस करून येईल तरतरी
थोडे करू ***gossping*** जास्त करू ***shopping***
**Friends** बरोबर करू मस्त ***Hotelling***
***Life*** आता मस्तीशीं आहे
आज 'त्यांच्या' बरोबर ***Date*** आहे
पंचविशीतला ***Romance*** परत आणूया
चटपटीत लोणच्यासारखा त्याला मुरवूया

– सौ. कीर्ती नरेंद्र देव, पुणे
मो. ९९७५६१३७१२

## निर्जीव राधिका

घन कुंतल ठीबठीब गळती
पाऊस कधीचा पडतो
नि हिंदोळी बसलेली
हरवली कुठे ती न कळते
कोणते दु:ख तीस सलते
सोडुनी जरी गेला तो
हृदयात तिच्या जो वसतो
तो स्वत:च होती कृष्ण
कोणती तृष्णा शमविते
प्राण तिचा घनश्याम
बाहेर निघोनी गेला
झुल्यावर बसलेली ती
निर्जिव राधिका दिसते

*– डॉ. सौ. प्रतिभा भिडे* ठाणे. ९८३३२८४६९०

# विनम्र अभिवादन

**माझ्या पूर्वजांचा आशीर्वाद**
**नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठानला लाभून,**
**आपल्या भिडे प्रतिष्ठानचा उत्तरोत्तर उत्कर्ष व्हावा**
**ही माझी सदिच्छा आणि माझ्या परिवाराकडून**

हार्दिक शुभेच्छा

शशीताई घुले (भिडे)

**माझे खापर-खापर पंजोबा**
श्री. गोविंद माधव भिडे
सौ. सत्यभामा गोविंद भिडे

→

**माझे पंजोबा पंजी**
श्री. वामन गोपाळ भिडे
सौ. रमा वामन भिडे
श्री. गोपाळ गोविंद भिडे
सौ. रुक्मिणी गोपाळ भिडे

↓

**माझे आजोबा**
श्री. निळकंठ वामन भिडे
सौ. कृष्णा निळकंठ भिडे व
सौ. पार्वती निळकंठ भिडे

←

**माझे माता-पिता**
ती. भालचंद्र निळकंठ भिडे
ती. सौ. सरस्वती भालचंद्र भिडे

↓

**माझे बंधू**
श्री. गोविंद भालचंद्र भिडे सौ. रमा गोविंद भिडे
श्री. दिलीप भालचंद्र भिडे सौ. पद्मजा दिलीप भिडे

# ऋषितुल्य !

## १) श्री. रामकृष्ण दत्तात्रय भिडे, वय ७१ वर्षे

पुणे विद्यापीठातून बी.ई. (इलेक्ट्रीकल) पदवी विशेष प्राविण्यासह. अमेरिकेमध्ये 'संगणक' ह्या विषयातून पदव्युत्तर एम.एस. केले. गोव्यातील सर्व प्रथम अभियंता आहेत. काही वर्षे नोकरी केल्यानंतर स्वतःचा व्यवसाय सुरू केला. अजूनही इलेक्ट्रीकल कन्सल्टंट म्हणून काम करतात. रामदेवबाबा यांच्या पतंजली योगपीठाकडून रितसर योगाचे प्रशिक्षण घेऊन गोव्यामध्ये योगशिबिरे आयोजित करतात. रोटरी क्लब ह्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी सांभाळतात. यजुर्वेदीय संध्या सुलभपणे करण्यासाठी सीडी तयार केली. ह्यामध्ये मंत्रोच्चारासह प्रात्यक्षिक व लिखित स्वरूप दिसून येते. पोर्तुगीज भाषेवर उत्तम प्रभुत्व ह्या शिवाय अध्यात्म, संगीत व वाचन यांची विशेष आवड आहे. साधी राहणी, मितभाषी आणि सततचे कार्यमग्न असणारे असे हे अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे.



## २) डॉ. देविदास दत्तात्रय भिडे, वय ७५ वर्षे

बी.ई., एम. ई. असून बर्कल विद्यापीठातून हार्बर इंजिनिअरींगमध्ये डॉक्टरेट, EICEUM SATMEV ह्या परीक्षेत विशेष यश मिळवून उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळविली. वयाच्या १८ व्या वर्षी शिक्षणासाठी परदेशी जाऊन इंजिनिअरींगची पदविका संपादन केली. परदेशी राहून सुद्धा शाकाहारी व निर्व्यसनी. काही काळ आय.आय.टी. मध्ये लेक्चरर म्हणून नोकरी. त्यानंतर अनेक नामांकित कंपन्यांमध्ये उच्चपदावर नोकरी केली. १९९३ पासून पुणे येथे स्वतंत्रपणे सल्लागार म्हणून काम करताना देशातील बंदर प्रकल्पासाठी मार्गदर्शन. भागिरथी भिडे फाऊंडेशन ह्या संस्थेमार्फत १९८६ ते १९९१ ह्या पाच वर्षांमध्ये रायबंदर गोवा येथील शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीमधून आर्थिक मदत केली. २०१३ मध्ये दादासाहेब फाळके सिने पुरस्कार सोहळ्यात लघुपटाचे प्रसारण केले. ह्या लघुपटाच्या माध्यमातून दारूच्या दुष्परिणामांची माहिती देऊन सामाजिक जागृती करतात. विशेष म्हणजे ह्या बहुगुणी व्यक्तीला मराठी, हिंदी, इंग्रजी, कोकणी, संस्कृत, तमिळ ह्यांबरोबर पोर्तुगीज, जर्मन व फ्रेंच अशा एकूण ९ भाषा अवगत आहेत. सध्या त्यांचे रायबंदर, गोवा येथे वास्तव्य आहे.



## ३) डॉ. अलका देविदास भिडे, वय ७० वर्षे

डॉ. अलका ह्यांनी मुंबईमध्ये एम.बी.बी.एस. केले. १९७४ मध्ये डॉ. देविदास ह्यांच्याशी विवाह करून दिल्ली येथे स्थाईक झाल्या. दिल्लीमध्ये स्वतःचा दवाखाना चालविताना सर्व्हंटस् ऑफ पिपल्स सोसायटी ह्या संस्थेमध्ये सलग १४ वर्षे विनामूल्य सेवा केली. १९८८ मध्ये मद्रासमध्ये अपोलो हॉस्पिटलमध्ये नोकरी, मात्र सुट्टीच्या दिवशी सामाजिक बांधिलकीतून त्या दिवशी सुद्धा राकमकृष्ण मठाच्या माध्यमातून विनामूल्य सेवाही देत असत. त्यामुळे साहजिकच तमिळ भाषाही शिकल्या. त्यानंतर ३ वर्षे पुण्यात रुबी हॉल येथे नोकरी केली, १९९६ ला पुणे, कोथरुड येथे स्वतःचे क्लिनिक सुरू केले. पण आजही रुग्णसेवेमध्ये रमणाऱ्या डॉ. अलकाताई गरीब रुग्णांना आपले हितचिंतक मानतात. पती डॉ. देविदास ह्यांना परदेशात विविध ठिकाणी उच्चपदावर नोकरी केल्यामुळे संपूर्ण जगप्रवास करण्याची संधी मिळाली.



आजमितीला पती उच्चशिक्षित, कन्या-जावई, नातवंडे यांच्या समवेत त्या समाधानी आहेत.

### ४) श्रीमती कमल कृष्ण भिडे, वय ८२ वर्षे

जन्म बेळगाव येथे झाला. दत्तक वडील नारायण महादेव गोडबोले. श्रीमती कमल यांचे शिक्षण बी.ए.,बी.एड., संगीतामध्ये विशारद आहेत. प्राथमिक शिक्षिका म्हणून नोकरी. वयाच्या २५ व्या वर्षी कृष्ण दत्तात्रय भिडे यांचेशी विवाह झाला. त्यांना ३ मुली व १ मुलगा. मुले लहान असताना सुद्धा बी.ए.पर्यंत शिक्षण करून बाहेरून परीक्षा देऊन शिक्षण पूर्ण केले. वयाच्या ५८ व्या वर्षी शहापूर बेळगांव शाळेतून प्राथमिक शिक्षिका म्हणून निवृत्त. सामाजिक कार्याची आवड आहे. गणेशोत्स, राम मंदिर शिलान्यास ह्या माध्यमातून सामाजिक सेवा केली. संगीत विशारद असल्यामुळे व संगीताच्या आवडीमुळे बेळगांव येथे विविध कार्यक्रमांतून बक्षिसे मिळविली.



### ५) श्रीमती यशोदा काशिनाथ भिडे, वय ७६ वर्षे

जन्म धारबांदोडा, गोवा. माहेरच्या बर्वे. शिक्षण ७ वी पास. बुद्धी तल्लख असून सुद्धा कुटुंबातील ज्येष्ठ अपत्य असल्याने आपल्या इतर भावंडांची जबाबदारी असल्या-मुळे पुढील शिक्षण घेता आले नाही. वयाच्या १८ व्या वर्षी स्व. काशिनाथ वामन भिडे, मु.वन, डिचोली, गोवा यांचेशी विवाह. वयाच्या ३७ व्या वर्षीच पतीचे अल्पशा आजारामुळे निधन. त्यामुळे मुलांचे शिक्षण व त्यांना वाढविण्यासाठी कष्टाने प्रयत्न करून आज त्या गोव्यामध्ये समाधानात आहेत.



आम्ही भिडे अंक आपणास वेळेत मिळण्यासाठी प्रतिष्ठानकडून संमेलनामध्ये अद्ययावत (update) पत्त्यांची यादी पाहण्यासाठी ठेवलेली आहे. त्यामध्ये आपला पत्ता नसेल वा चुकीचा/अर्धवट असेल तर दुरुस्त करा.

### ६) श्रीमती शोभना बाळकृष्ण भिडे, वय ८२ वर्षे.

जन्म गांजे, उसगांव, गोवा येथे, माहेरच्या कु. कुसुम बर्वे. शिक्षण इ. ४ थी पर्यंत. १९६२ मध्ये रामकृष्ण वामन भिडे, यांचेशी विवाह झाला. दोन मुले आणि ३ मुली असा परिवार असून मुली लग्नानंतर आपल्या संसारात असून एक मुलगा आयुर्वेदिक डॉक्टर असून दुसरा शेतकी खात्यात नोकरीस आहे.



### ७) सौ. अर्चना आनंद काकतकर, वय ७० वर्षे

इ. ११ वी पास झाल्यावर दिल्ली येथील आय. टी. आय. मधून ड्राफ्टसमनचा कोर्स पूर्ण करून ४२ वर्षे मुंबईत नोकरी केली. त्याचबरोबर मुंबई मध्ये संस्कृती संवर्धन प्रति-ष्ठानच्या माध्यमातून रामायण, महाभारत ह्यांवर आधारित कार्यक्रम घेऊन परीक्षा घेतात तसेच इतर सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग असतो. रायबंदर, गोवा येथील 'गोपाल' ह्या दारुमुक्त समाजासाठी विविध उपक्रमात सहभागी होतात. याचाच एक भाग म्हणून मुंबईमध्ये विविध संस्थांना भेटी देऊन 'प्रतिष्ठा' ह्या लघुपटाचे प्रदर्शन व चर्चा असे उपक्रम राबवतात तसेच उपजतच मेंदी, चित्रकला, वारलीची रांगोळी ह्या कलेची विशेष आवड आहे.



### ८) श्रीमती सुलोचना जिवाजी भिडे, वय ७० वर्षे

माहेरच्या कु. विजया कृष्णा भावे, पाली गोवा. वयाच्या २० व्या वर्षी स्व. जिवाजी वामन भिडे यांचेशी विवाह. तीन मुलगे असून घरामधील कठीण परिस्थितीवर मात करून मुलांचा सांभाळ करून उच्चशिक्षित केले. ह्या करिता त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.



# श्री ब्रह्मचैतन्य - गोंदवलेकर महाराज

*श्री. हरिभाऊ भिडे, सांगली यांनी ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांवर लेखमाला लिहिली आहे. त्यांचे चिरंजीव श्री. मिलींद याने ही लेखमाला 'आम्ही भिडे' अंकात प्रसिद्ध करण्यासाठी आमच्याकडे सुपूर्द केली आहे. 'आम्ही भिडे'च्या प्रत्येक अंकामध्ये शक्य असेल त्याप्रमाणे हे लेख प्रसिद्ध करण्याचा मानस आहे. कै. हरिभाऊ नुकतेच अनंतात विलीन झाले असले तरी लेखमालेच्या रूपाने आपण पुन्हा त्यांना पाहूया.*

**- श्री. मिलींद भिडे**, मिरज
मो. ९४२११२३००३.

गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः।
गुरू साक्षात परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥



श्री परमपूज्य गोंदवलेकर महाराज यांचा जन्म गोंदवले येथे श्री. रावजी व सौ. गीताबाई यांचे पोटी माघ शुद्ध द्वादशी पहाटे सूर्योदयाचे वेळी झाला. (शके १७६६ इ.स. १८४५) त्यांचे शरीर सुदृढ व गौर कांतीचे होते. गोंदवले नगरीत ते सर्वांचे लाडके बाळ होते. व्रतबंध झालेनंतर त्यांना गुरुजींनी संध्या, पवमान, रुद्र व इतर धार्मिक स्तोत्रे शिकवली. पण महाराज एकपाठी असल्यामुळे त्यांना पाठांतर करावे लागले नाही. त्यांनी सर्व धार्मिक आचारविचार थोड्याच दिवसांत आत्मसात केले. ते बाळक्रीडेत रमले नाहीत. त्यांनी राम नामाचा ध्यास घेतला व त्यांना गुरु उपदेशाची ओढ लागली. त्यांचा जन्म मुळी रामनामासाठी झाला होता.

जयाचा जनी जन्म नामान झाला।
जयाने सदा वास नामात केला।
जयाचे मुखी सर्वदा नामकिर्ती।
नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती॥

त्यांना गुरु भेटीची तळमळ लागली. श्री संत तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे ''सद्‌गुरू वाचोनि सापडेना सोय। धरावे ते पाय आधी आधी॥'' ते गुुशेधार्थ बाहेर पडले. त्यांनी सर्व महाराष्ट्र पालथा घातला. पण गुरुचा ठाव मिळेना. कर्नायकात समर्थभक्त श्री रामकृष्ण महाराज त्यांना भेटले. ते म्हणाले, ''बाळ तुझा गुरु तुकामाई हे येहळेगाव येथे आहेत. ते तुझी वाट पहात आहेत. तुझे कल्याण होईल''. त्याप्रमाणे महाराज मजलदरमजल करीत येहळेगाव येथे पोहोचले. गावात चौकशी करुन त्यांनी संत तुकामाई यांची भेट घेतली. आपला भक्त कधी येतोय, याची ते वाट पहात होते. महाराजांनी त्यांचे चरण स्पर्श करुन वंदन केले.

श्री तुकामाई महाराजांनी त्यांना आशीर्वाद दिला. त्यांनी गोंदवलेकर महाराजांच्या बऱ्याच परीक्षा घेतल्या. त्यात महाराज उत्तीर्ण झाले. त्यांनी महाराजांना गुरुमंत्र दिला. 'श्रीराम जय राम जय जय राम।'

त्यानंतर महाराज गुरुआज्ञेप्रमाणे तीर्थाटन करून गोंदवलेस परत आले. गुरूंचे आज्ञेप्रमाणे त्यांनी प्रपंच करून परमार्थ करणेचे ठरविले. मध्यंतरी श्री. रावजी यांचे देहावसन झाले. गीताताईनी त्यांचे लग्नाची धडपड सुरू केली. त्यांचे लग्न खातवळचे संभाजी कुलकर्णी यांचे मुलीबरोबर झाले. तिचे नाव सरस्वती असे ठेवले. अशा तऱ्हेने त्यांचा संसार सुरू झाला. आईचे सांगणे वरून त्यांनी आपले पत्नीस तुकामाईचे दर्शनास नेले. गुरूचे प्रसादाप्रमाणे त्यांना एक मुलगा झाला, पण तो अल्पायुषी ठरला. पुढे त्यांच्या बायकोचेही देहावसान झाले. पण आईचे सांगणेवरून महाराजांनी आटपाडी येथील देशपांडे यांच्या अंधकन्येशी विवाह केला. तिचे

नाव सरस्वतीच ठेवले. येथे महाराजांचे मोठेपण व दिलदारपणा दिसून येतो.

आतापर्यंत महाराजांची कीर्ति सर्वठिकाणी पसरली. सर्वजण महाराजांचे भेटीस गोंदवलेस येऊ लागले. त्यांनी गोंदवलेस 'रामनामाची पेठ'च उघडली होती.

महाराज म्हणायचे, 'भक्तजन हो या. रामनामाचा जप करा. तो नाम मंच आहे. रामाचा प्रसाद घ्या. मनःशांती मिळवा. राम हा कृपेचा सागर आहे. प्रपंचात होणारी जिवाची घालमेल कमी करा. त्यावर नाम हा तोडगा आहे. माझेकडे सारे भाविक प्रापंचिक अडचणी घेऊन येतात. मला प्रश्न विचारतात. पण कोणीही रामभक्तीचा मार्ग अगर आत्मज्ञान प्राप्तीचे साधन विचारीत नाही. सर्वांनाच प्रापंचिक सुख हवे असते. पण सुख-दुःख या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. सुखामागून दुःख व दुःखामागून सुख येत असते. मनःशांतीसाठी रामनाम जप करणे हा मंत्र आहे. म्हणजे दुःखाचा त्रास होणार नाही. ते सहन करण्याची शरीराचे गात्रात ताकद येईल. दुःखे ही दैवजात असतात. त्यावर रामनाम हा एकच रामबाण उपाय आहे. माझेकडे जादूटोणा वगैरे काही नाही. फक्त रामनामानेच कार्य सफल होते. संत तुकाराम महाराज हेच म्हणात,

'ठाईच बैसोनि करा एक चित्त।
आवडी अनंत आळवावा।
रामकृष्ण हरी विठ्ठल केशवा।
मंत्र हा जपावा सर्वकाळ॥'

तुम्ही सर्वांनी जीवनातील तीन गोष्टींचा त्याग करा. १) मी, २) माझे, ३) मला. मी म्हणजे अहंभाव. माझे म्हणजे आसक्ती व मला म्हणजे हाव. (प्रत्येक गोष्टीचा हव्यास) म्हणजे तुम्ही प्रपंचात राहून परमार्थ करू शकाल. महाराजांचे समाजकार्य तीन प्रकारचे होते.

१) गोरक्षण २) भक्तीचा प्रसार ३) अन्नदान.

१) त्यांनी कसायाकडून अनेक गायी परत घेतल्या व त्यांना आपले घरी आसरा दिला. २) त्यांनी हजारो लोकांना रामनाम मंत्र दिला. याची गोंदवलेस येणाऱ्या असंख्य भक्तांवरून कल्पना येते. ३) गोंदवलेस नियमित अन्नदान चालू असते. सर्व दानांत अन्नदान व ज्ञानदान ही श्रेष्ठ दाने आहेत.

त्यांचे भक्तांना एकच सांगणे होते.

'दाता राम सुखाचा, संसारा मान तू प्रभूसेवा।
हाचि सुबोध गुरूचा संतोषा सर्वदा मनी ठेवा॥'

महाराजांना सर्व सिद्धी प्राप्त होत्या. त्यांनी आपले आईला काशीयात्रा घडविली. जाताना घरातील सर्व चीजवस्तू गावकऱ्यांना वाटून टाकली. तेव्हा गीताबाई म्हणाल्या 'गणोबा हे काय करतो आहेस ?' महाराज म्हणाले, 'कारण काय तर मागे काही आशा राहायला नको'.

काशीला गेल्यानंतर गंगेच्या काठी त्यांनी आईचे हस्ते दानधर्म केला. गंगेच्या घाटावर आईसाहेब आसनावर बसल्या. तेव्हा महाराज म्हणाले, 'आई, गंगेवर येणाऱ्या सर्वांना तुला पाहिजे तसा दानधर्म कर. तुझ्या आसनाखाली पैसे आहेत'.

त्याप्रमाणे आईसाहेबांनी दानधर्म केला. तेव्हा आईसाहेब आश्चर्याने म्हणाल्या, 'ही किमया केव्हा शिकलास मला काहीच कल्पना नाही'. त्यावर महराज म्हणाले 'ही सिद्धी माझी नाही. ही किमया रामाची आहे. मी निमित्तमात्र आहे. पण प्रपंचासाठी या सिद्धीचा उपयोग करणेचा नाही.'

आईला घेऊन नंतर महाराज अयोध्येस गेले. तेथेच आईसाहेबांचे महाराजांचे मांडीवर देहावसान झाले. नंतर महाराज गोंदवलेला परतले. आता आपले कार्य संपले आहे असे समजून ते नैमिषारण्यात जाणेस निघाले. सर्व भक्तांनी न जाणेबद्दल विनंती केली. पण महाराज तयार होईनात. जाणेपूर्वी महाराज रामाचे दर्शनास गेले. तेव्हा त्या रामाचे मूर्तीचे डोळ्यांतून अश्रूधारा सुरू झाल्या. हे पाहून महाराज गहिवरले व त्यांनी जाणेचे रहित केले. श्री महाराजांचे निस्सीम भक्त श्री आनंद सागर यांचे खालील काव्यात महाराजांचे जीवन दर्शन घडते.

(पान ४३ वर)

# नाडण भिडे कुल वार्षिक संमेलन

- ॲड. विनोद य. भिडे, औरंगाबाद
मो. ९२२६४९४१०३

भिडे कुलवृत्तांताच्या सन २००८ मध्ये प्रकाशित झालेल्या दुसऱ्या आवृत्तीत पान ३५२ वरती निवेंडी नाडण वंशाची माहिती दिली आहे. नाडण हे मूळ गाव. श्री व्याडेश्वर गुहागर व श्री योगेश्वरी अंबेजोगाई ही कुलदैवते व मूळ घरी नाडण येथे भाद्रपद शुद्ध प्रतिपदा ते नवमी असे श्री गणपतीचे नवरात्र, शुभ कार्यानंतर बोडण वगैरे कुलाचार पाळणाऱ्या या वंशाच्या सात ते दहा क्रमांकाच्या पिढ्या आजही स्वतःचे वैशिष्ट्य व वेगळेपण जोपासत परस्परांशी गुण्यागोविंदाने नांदत आहेत. सुरुवातीस साधारणतः महाराष्ट्रात पण नंतरच्या पिढ्या संपूर्ण भारतात व परदेशातही स्वतःची कर्तबगारी, सचोटी व विद्वत्तेच्या बळावर नावलौकिक मिळवून कुलाच्या लौकिकात भर घालत आहेत. वर्षभरात शुभकार्य व इतर प्रसंगी आणि झालंच तर मे महिन्यात आंब्यांची मौज लुटायला घरी नाडणात ही सारी मंडळी आपापल्या आप्तेष्टांसह परस्परांना भेटतच असतात. पण ज्यांचेकडे कार्य असेल तो व छोट्या अवधीच्या सुटीचे येणारे पाहुणे या सर्वांचीच काहीशी धावपळ होते व आलेला प्रत्येकजण प्रत्येकाशी भेटून संवाद साधू शकत नाही. म्हणूनच कोणत्याही विशेष कारणास्तव केवळ एक सामूहिक आनंदोत्सव साजरा करण्यासाठी, पुढच्या विस्तारित पिढ्यांनी परस्परांना जाणून घेण्यासाठी दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी या नाडण भिडे वंशाचे वार्षिक संमेलन भरविण्याचं ठरलं आणि ती सूचना सर्वांनीच उचलून धरली. एकदा संकल्प केला की तो तडीस न नेतील ते भिडे कसले ? यशस्वी आयोजनाची मालिकाच मुळी सुरू झाली. यापूर्वी अशी वार्षिक संमेलने रत्नागिरी व पुण्यात झाली होती.

यंदाचे नाडण भिडे कुलवंशाचे संमेलन दि. १० व ११ डिसेंबर २०१६ रोजी श्रीरामपूर जि. अहमदनगर येथे या वंशाच्या आठव्या पिढीतील उद्योजक श्री. दीपक दत्तात्रय भिडे, त्यांच्या सौभाग्यवती आरती भिडे व चिरंजीव तेजस यांच्या कुशल आयोजनातून संपन्न झाले.

नाडण, मुटाट, रत्नागिरी, कुडाळ, कोल्हापूर, दादर, माहीम, टिटवाळा, पुणे, लिंबागणेश बीड, औरंगाबाद इत्यादी ठिकाणांहून तब्बल ६४ कुलबंधू-



भगिनी, सुना, नातवंडे अशा चार पिढ्या दोन दिवस संमिलीत झाल्या.

सातव्या पिढीतील कै. दत्तात्रय रामचंद्र भिडे यांची पूर्ण कारकीर्द श्रीरामपूर येथे गेली होती आणि तेथेच त्यांचे चिरंजीव श्री. दीपक यांनी स्वतःचे मेहनतीतून साकारलेल्या भव्य वास्तूत हा मेळावा संपन्न झाला हे त्याचे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. कै. दत्तात्रय ऊर्फ अण्णा भिडे यांच्या स्मृतीस अभिवादन करून कार्यक्रम सुरू झाला. त्यांच्या पिढीतील श्री. यशवंत ऊर्फ बापूकाका (८९), त्यांची पत्नी सौ. उज्वला (८४), दीपकरावांच्या मातोश्री सलीला (८२) यांनी मार्गदर्शनपर साधलेला संवाद मुलगे, लेकी, सुना, जावई आणि नातजावयांनी सांगितलेल्या आठवणी इथपासून पणती स्वरा कुलकर्णींच्या दंगामस्तीपर्यंत सातव्या पिढीतील माहेरवाशीण सौ. वैदेही जोशी यांनी स्वतःचे अनुपस्थितीत पाठविलेल्या स्वरचित प्रसंगोचित कवितेच्या वाचनापासून ते नवव्या पिढीतील कु. मुक्ता विवेक भिडे हिने ती काम करत असलेल्या 'अनादी मी अनंत मी' या नाटकातील स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर रचित पोवाड्याचे केलेले सादरीकरण, सारे काही वैशिष्ट्यपूर्ण होते. जोडीला ताजे खाद्यपदार्थ, जेवणावळी, भटकंती, थंडी, शेकोटी आणि खेळ सारेच भारी होते.

गतवर्षीच्या दुष्काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी कहर केला होता. पाण्यासाठी गावंच्या गावं विस्थापित होत होती. अशातही स्वतःची उभी पिकं वाळवून टाकून आपल्या विहिरींचे पाणी समस्त गावकऱ्यांना विनामोबदला उपलब्ध करून देणारे लिंबागणेश, जि. बीड या दुष्काळी भागातील शेतकरी श्री. कृष्णाजी कानिटकर यांच्या माणुसकीची त्यावेळी प्रसारमाध्यमांनी वाहवा केली होती. हे श्री. श्रीकृष्ण कानिटकर श्री. दीपक भिडे, श्रीरामपूर यांच्या ज्येष्ठ भगिनी सौ. देवयानी यांचे यजमान म्हणजे चक्क भिड्यांचे जावई आहेत याचा आम्हा सर्वांनाच सार्थ अभिमान आहे. या संमेलनात श्री. कृष्णाजी कानिटकर यांचा बापूकाकांच्या हस्ते झालेला सत्कार हा सर्वांच्या आठवणीत राहिलेला हृद्य प्रसंग.

दोन दिवस कसे भुर्रकन संपले कळलंच नाही. पुढील वर्षी मोठ्या संख्येने नव्या ठिकाणी भेटण्याचा संकल्प करत व काही कारणांनी यंदा उपस्थित राहू न शकलेल्या सदस्यांना निरोप देत प्रत्येकजण परतीच्या प्रवासाला मार्गस्थ झाला. प्रत्येकाने नाडण भिडे वंशातील सदस्य असल्याचा अभिमान जागविला. ☐

## श्री ब्रह्मचैतन्य - गोंदवलेकर महाराज

(पान ४१ वरुन)

स्वामी माझा पाहिला या माणगंगातीरी।
सद्गुरू तो देखिला या माणगंगातीरी।
माणगंगातीरी प्रभू हा गोंदवले भुवनी। स्वामी माझा ॥ध्रु॥
ब्रह्मचैतन्याची गाथा। प्राप्त नोहे कमलनाथा।
भोळ्या भाविक भक्ताला या। धाऊनिया आला। या माण.. ॥१॥
गौरवर्ण कांती। मूर्तीमंत शांती।
दया क्षमा शोभे चित्ती। रामनामी रंगला॥ या माण..॥२॥
केशरी त्रिपुंड भाळा। गळा तुळशीच्या माळा।
कपनी शोभे ज्याला। पादुका पायाला। या माण... ॥३॥
गाई ब्राह्मण अनाथांचा। कैवारी तो दीनांचा।
विश्वास या नामाचा। जगी वाढविला। या माण... ॥४॥
भवभार फार झाला। जीव तळमळू लागला।
सगुण रूपे धावत आला। अभय वर दिला। या माण ... ॥५॥
आनंद सागर दास दीन। पदी घेतसे लोळण।
तुझे रूप हे सगुण। सदा राहो डोळा। या माण...॥६॥

अशा या संतश्रेष्ठ गोंदवलेकर महाराज यांचे महानिर्वाण गोंदवले येथे मार्गशीर्ष वद्य दशमी शके १८३५ दि. २२ डिसेंबर १९१३ रोजी सूर्योदयाचे सुमारास झाले. महाराजांचा जन्मोत्सव व पुण्यतिथीचा उत्सव गोंदवले येथे मोठ्या प्रमाणात साजरा होतो. असंख्या भाविक येत असतात. रामनाम जप व अन्नदान होत असते. झालेली लेखन सेवा श्री महाराजांच्या चरणी अर्पण....

# भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

## जानेवारी

१. श्री. श्रीकांत प्रभाकर भिडे, रोहा १
२. श्री. प्रभाकर शंकर भिडे, सोलापूर १
३. श्री. मंदार उदय भिडे, देवरुख १
४. श्री. विश्वनाथ दिवाकर भिडे, पुणे १
५. श्री. केदार विनय भिडे, पुणे १
६. श्री. श्रीकांत मोरेश्वर भिडे, पुणे ३
७. श्रीमती वीणा वसंत भिडे, ठाणे ३
८. श्री. चिन्मय श्रीकृष्ण भिडे, पुणे ६
९. श्री. गजानन सदाशिव भिडे, पुणे ९
१०. सौ. चित्रा विजय भिडे, भोपाळ ११
११. श्री. संदीप कृष्णराव भिडे, बेळगांव ११
१२. श्री. प्रसन्न भास्कर भिडे, मुंबई १२
१३. सौ. सुकृता संदीप भिडे, अंमळनेर १२
१४. डॉ. विजय कृष्णा भिडे, भोपाळ १५
१५. सौ. शैलजा अरविंद वाडदेकर, पुणे १५
१६. डॉ. विवेक यशवंत भिडे, रत्नागिरी १६
१७. श्री. मंदार श्रीकृष्ण भिडे, पुणे २२
१८. श्रीमती कुसुम नारायण नगरकर, पुणे २४
१९. सौ. विद्या चिंतामणी भिडे, ठाणे २५
२०. श्री. मधुकर शंकर भिडे, रायगड २६
२१. सौ. मनाली मंदार भिडे, पुणे २८
२२. श्री. परीक्षित सुहास भिडे, पुणे ३०
२३. श्री. मधुकर गोविंद भिडे, गुजराथ ३१

## फेब्रुवारी

१. कु. राजस प्रदीप भिडे, पुणे २
२. श्री. संजय दत्तात्रय भिडे, कोल्हापूर ३
३. श्री. सारंग शरद भिडे, पुणे ५
४. श्री. मंदार भगवान भिडे, रत्नागिरी ७
५. श्री. विजय अरविंद भिडे, पुणे ८
६. श्री. शरद नारायण भिडे, पुणे ९
७. सौ. गौरी श्रीगणेश जोगवेकर, कल्याण ९
८. श्री. निनाद दत्तात्रय भिडे, ठाणे ९
९. कु. ईरा हर्षवर्धन भिडे, पुणे १०
१०. श्री. विश्वनाथ रघुनाथ भिडे, कामशेत १०
११. श्री. वसंत रामकृष्ण भिडे, पुणे १३
१२. सौ. सुजाता प्रसन्न भिडे, मुंबई १३
१३. सौ. कल्पना संजय भिडे, माणगांव १५
१४. श्री. विकास कृष्णाजी भिडे, कल्याण १५
१५. सौ. गौरी हर्षवर्धन भिडे, पुणे १७
१६. श्री. उदय गजानन भिडे, देवरुख १७
१७. श्री. श्रीराम वामन भिडे, पुणे १८
१८. श्री. चिंतामणी जनार्दन भिडे, ठाणे १९
१९. श्री. अमित प्रकाश भिडे, डोंबिवली १९
२०. श्रीमती कमला कृष्णा भिडे, बेळगांव १९
२१. श्री. विनायक केशव भिडे, रायगड २०
२२. सौ. स्वाती राजेंद्र भिडे, डोंबिवली २०
२३. श्री. संतोष सखाराम भिडे, डोंबिवली २०
२४. श्री. वसंत नरहर भिडे, ठाणे २१
२५. श्रीमती सुलभा दिनकर भिडे, कल्याण २२
२६. श्री. बाळकृष्ण दामोदर भिडे, पुणे २४
२७. सौ. मानसी मुंकुंद भिडे, बेळगांव २५

## मार्च

१. श्री. प्रसाद रमेश भिडे, कल्याण १
२. कु. स्वानंद श्रीकांत भिडे, रोहा ४
३. सौ. प्रज्ञा संतोष भिडे, ठाणे ४
४. सौ. संपदा राजेंद्र भिडे, दादर ५
५. श्री. काशिनाथ लक्ष्मण भिडे, सोलापूर ७
६. श्री. अमित ए. भिडे ७
७. श्री. मिलींद मुकुंद भिडे, पुणे ७
८. श्री. सुधीर केशव भिडे, पुणे ८
९. सौ. शकुंतला मधुकर भिडे, रायगड १०
१०. श्री. विश्वनाथ गोविंद भिडे, पुणे ११
११. सौ. रोहिणी प्रभाकर भिडे, पुणे १५
१२. श्री. बाळकृष्ण ल. भिडे, कर्नाटक १६
१३. श्री. सुदर्शन सुरेश भिडे, पुणे १६
१४. श्री. शरद शंकर भिडे, सांगली १७
१५. श्री. सुनील वामन भिडे, पुणे १७
१६. श्री. संजय भिडे, मुंबई १९
१७. श्री. एम. उपेंद्र भिडे, बेंगलोर २४
१८. श्री. मा. य. भिडे, हैद्राबाद २५
१९. सौ. स्वाती अजय भिडे, पुणे ३०
२०. सौ. आशा अनिल भिडे, भोपाळ ३०
२१. श्री. अभिषेक विजय भिडे, पनवेल ३१
२२. सौ. राधिका श्रीधर रानडे, पुणे ३१
२३. श्री. अमोल शशिकांत भिडे, पुणे ३१

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. संपादक : प्रफुल्ल डबीर फोन : 0231-2540427

**RNI No. : M-6 (1457)/70-RNI * Reg. No. KLR 136/15-17 Posted in Kolhapur RMS**

# अंक परत येणारे पत्ते....

**गेल्या वर्षात सुमारे ५० पेक्षा जास्त 'आम्ही भिडे' अंक बदललेला पत्ता, किंवा अन्य कारणाने परत येत आहेत. आमच्याकडे परत आलेल्या अंकाचे पुनर्वितरण केले जाणार नाही. परंतु आपल्या माहितीकरिता खाली दिलेल्या यादीनुसार खालील व्यक्तींनी आपला नवीन अथवा बदललेला पत्ता आम्हाला लेखी पत्राने किंवा एस.एम.एस. करून खालील मोबाईलवर कळविल्यास पुढील अंकाचे वितरण आलेल्या पत्त्यानुसार केले जाईल, ह्याची कृपया नोंद घ्यावी.**

**दिलीप भिडे (पुणे),९६५७५४१२३६** **ले.क. सुनिल भिडे (पुणे),९६२३०१७४४४**

**प्रदीप भिडे (डोंबिवली), ९८९२५०४०४२**

**पुणे विभाग :**

१) श्री. राजीव श्रीनिवास भिडे
बी/९/८ गुरुगणेशनगर, कोथरुड, पुणे ४११ ०३८

२) श्री. भालचंद्र शिवराम भिडे
बिल्डिंग नं. २२, प्लॉट नं. १७, आनंदनगर, कोथरुड, पुणे - ४११ ०२९

३) श्री. विजय मोरेश्वर भिडे
१३४, शनिवार पेठ, आपटे घाट, कर्वे मंगल कार्यालयाजवळ, पुणे ४११ ०३०

४) श्री. चंद्रकांत भिडे
११, अनिता कुंज सोसायटी, १७ वा रोड, ३०, डहाणूकर कॉलनी, कोथरुड, पुणे ४११ ०२९

५) श्री. माधव प्रभाकर भिडे
अमेय अपार्टमेंट, चिंतामणीनगर, पर्वती, पुणे - ४११ ००९

६) श्री. प्रभाकर वासुदेव भिडे
३, अमेय अपार्टमेंट, चिंतामणीनगर, पर्वती, पुणे - ४११ ००९.

७) श्री. अनंत दत्तात्रय भिडे
बी/१, स्वस्तिश्री, सर्व्हे नं. २९/३/२, मंत्रीपार्क जवळ, कोथरुड, पुणे ४११ ०२९

८) श्री. अशोक यशवंत भिडे
१८, नवनम्रता सोसायटी, वनाज कॉर्नर, पंजाब नॅशनल बँकेसमोर, पौड रोड, पुणे ४११०३८

९) श्री. दिगंबर विठ्ठल भिडे
सी/बी-२३/२४ क्लेरियन पार्क, औंध, पुणे - ४११ ००७

१०) श्री. चंद्रशेखर दत्तात्रय भिडे
भरतकुंज सोसायटी, मंगलमूर्ती रेसिडेन्सी, प्लॉट नं. २०९, कर्नाटक हायस्कूलजवळ, पुणे - ४११ ०३८

११) श्री. श्रद्धानंद संजय भिडे
फ्लॅट नं. २०, पवनानगर, चिंचवड गांव, पुणे - ४११ ०३३.

१२) श्री. आदित्य मनोहर भिडे
इंद्रायणी अपार्टमेंट, श्रीराम सोसायटी, वारजे, कोथरुड, पुणे - ४११ ०३८.

१३) कु. वासवी अरविंद भिडे
२१०१, विजयानगरी सोसायटी, कलाप्रसाद मंगल कार्यालयाजवळ, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.

१४) सौ. मंजिरी माधव भिडे
१५/८, श्रीप्रसन्न हौसिंग सोसायटी, एच.एस.सी. कॉम्प्लेक्स, इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७

१५) श्री. चिन्मय बर्वे, द्वारा : श्रीमती सुनिती भागवत, स्वस्तिश्री बिल्डिंग, फ्लॅट नं. ५, तेजसनगर, अमोद अंकुर समोर, कोथरुड, पुणे - ४११ ०२९.

१६) श्री. ए. बी. भिडे
८२०/८, अथर्ववेद अपार्टमेंट, कोथरुड, पुणे - ४११ ०२९.

१७) श्रीमती अमिता व्ही. भिडे
जी/३, डहाणूकर कॉलनी, कोथरुड, पुणे - ४११ ०२९.

१८) श्री. अवधूत अच्युत भिडे
सी/३०५, राजहिरा अपार्टमेंट, शनिवार पेठ,
पुणे - ४११ ०३०

१९) श्री. एस. एम. भिडे
४, ऐश्वर्यापुरी, ९, डहाणूकर कॉलनी,
पुणे - ४११ ०२९.

२०) श्रीमती गिरिजा आदित्य भिडे-देवधर
अनुजा, फ्लॅट नं. ५०८, अमृतकलश,
शाहू कॉलनी, कर्वेनगर, पुणे - ४११ ०५१.

२१) श्री. श्रीकांत वसंत भिडे
एम-४, सिद्धीनगर, विद्यासागर सोसायटी,
महेश सोसायटी, बिबवेवाडी, पुणे-४११०३७.

२२) श्री. राजेश सुरेश भिडे
बी/४५/११, अप्पर इंदिरानगर, शेवटच्या
बसस्टॉप समोर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०४८.

२३) सौ. चित्रा गाडगीळ
९०२, सदाफुली अपार्टमेंट, मोरेश्वर सभागृह
जवळ, कर्वे नगर, पुणे - ४११ ०५२.

२४) श्री. चारुदत्त जी. भिडे
२६६, जोशी बिल्डिंग, नवी पेठ,
पुणे - ४११ ०३०.

२५) श्रीमती भारती ए. भिडे
बी/४/५४/१ आर.बी.आय. क्वार्टर्स, सुधा,
पुणे - ५११ ००७.

## नागपूर विभाग

१) श्री. अशोक भिडे
यूएस/५, अमृता बाजार, मोदी नं. ३,
अग्रवाल लॉजसमोर, सीताबर्डी, नागपूर-४४००१२

२) श्री. रघुनाथ श्रीकृष्ण भिडे
८२, वैश्वी अपार्टमेंट, गोकुळ पेठ ले-आऊट,
नबाबा विहार समोर, नागपूर - ४४० ०१०.

## ठाणे विभाग

१) श्री. चिंतामण रावजी भिडे
३, रामचंद्र अपार्टमेंट, सोनावालाा कम्पाऊंड,
सिंधी गेट, कल्याण (प.), ठाणे - ४२१ ३०१.

२) श्री. चंद्रशेखर महादेव भिडे
९, मनिष अपार्टमेंट, ब्राह्मण सोसायटी, नौपाडा,
ठाणे (प.) - ४०० ६०२.

३) श्री. नितीन गजानन भिडे
ए/९०३, लुनावत टॉवर, सी-फेस, लुनावरनगर,
कोलवाडा, ठाणे - ४०० ६०१.

४) श्री. चंद्रकांत रामचंद्र भिडे
बी-३०५, लोटस मैत्री गार्डन,
ओसवाल पार्कजवळ, पोखरण रोड नं. २,
ठाणे (पू.) - ४०० ६०२.

५) श्री. आनंद गोविंद भिडे
६०१/बी-३, साकेत कॉम्प्लेक्स,
वीर सावरकर मार्ग, माजीवडे, ठाणे-४००६०१.

६) श्रीमती संगीता सुरेश भिडे
५०४, सोनिया अपार्टमेंट, प्रताप टॉकीज मागे,
ठाणे .

७) श्री. विश्वनाथ शंकर भिडे
आनंद कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. ४, गोळेवाडी,
कुळगांव, बदलापूर, ठाणे

## रायगड विभाग

१) श्री. माधव गोपाळ भिडे
भिडे वाडा, टिळक रोड, पनवेल,
रायगड - ४१० २०६

२) श्री. शंकर अनंत भिडे
१, चंद्रव्हिला, टिळक रोड, पनवेल,
रायगड - ४१०-२०६

३) श्री. अनंत गोपाळ भिडे
५९८, माउली अपार्टमेंट, टिळक रोड, पनवेल,
रायगड - ४०० २०६

४) श्री. विश्वास शंकर भिडे
१, चंद्रव्हिला, टिळकनगर, पनवेल,
रायगड - ४१० २०६.

५) डॉ. सुधाकर गोपाळ भिडे
३९८, डॉ. भिडे बंगला, टिळकरोड, पनवेल,
रायगड.

६) श्री. एम. जी. भिडे
माउली अपार्टमेंट, टिळक रोड, पनवेल,
रायगड - ४०० २०६

७) श्री. सी. ए. भिडे
पीएल ५९८/बी-१, माउली अपार्टमेंट, टिळक रोड,
पनवेल, रायगड - ४०० २०६

८) श्री. मुकुल वसंत भिडे
सिडको कॉलनी, सेक्टर १६, आय.सी.पी.एल.
कॉलनीसमोर, न्यू पनवेल, रायगड - ४१० २०६.

९) श्री. श्री. उमेश विनायक भिडे
बी-३०२, गोपाळकृष्ण सोसायटी, प्लॉट नं. २६,
सेक्टर १६, न्यू पनवेल, रायगड - ४१० २०६.

१०) श्री. श्री. विनायक शंकर भिडे
खांडपिले चौकाशी, न्यू मोदी नं. १, न्यू पनवेल,
रायगड - ४१० २०६.

११) श्री. विनायक शंकर भिडे
बी-३०२, गोपाळकृष्ण सोसायटी, प्लॉट नं. २६,
सेक्टर १६, न्यू पनवेल, रायगड - ४१० २०६.

१२) श्री. श्री. मोहन वसंत भिडे
सेक्टर ११, प्लॉट नं. १, सिडको सोसायटी,
न्यू पनवेल, रायगड - ४१० २०६

## मुंबई विभाग

१) सौ. शुभांगी भास्कर भिडे
ए/२, मीनल अपार्टमेंट, पाजी पासलकर मार्ग,
साकी नाका, अंधेरी (पू.), मुंबई - ४०० ०७२.

२) दिनकर विनायक भिडे
१०, आशिष कॉम्प्लेक्स, शिवाजी रोड,
दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६९.

३) श्रीमती शिल्पा महेश जोशी
आदर्शनगर, दत्तात्रय रोड, मालाड (पूर्व), मुंबई

४) डॉ. मिलींद भिडे
आत्मज सोसायटी, गोवालिया टँक,
ऑगस्ट क्रांती मार्ग, मुंबई - ४०० ०७२.

५) सौ. सायली विक्रांत भिडे
रहेजा विहार, अंधेरी (पू.), मुंबई - ४०० ०७२.

६) श्री. पद्माकर पी. भिडे
सी/१६, पहिला माळा, म्युनिसिपल कॉलनी,
भडकमकर मार्ग, मुंबई - ४०० ००८.

७) श्री. जयंत कमलाकर भिडे
बी/१, अरुणोदय सोसायटी, राजावाडी,
घाटकोपर (पूर्व), मुंबई - ७७.

८) श्री. सुधीर कृष्णाजी भिडे
६०१, अमित सोसायटी, जीवन विकास केंद्र मार्ग,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७.

९) श्री. मोहन प्रभाकर भिडे
श्याम-कमल, वि. स. खांडेकर मार्ग,
विलेपार्ले (पू.), मुंबई - ४०० ०५७.

## नाशिक विभाग

१) श्री. शरद विष्णू भिडे
६, गीत अपार्टमेंट, शरणपूर रोड,
नाशिक - ४२२ ००५.

२) श्री. चंद्रशेखर विठ्ठल भिडे
चैतन्यरामनगर, बांदा, सावंतवाडी, सिंधुदुर्ग.

३) श्री. निरंजन वामनराव भिडे
जठार पेठ, अकोला, महाराष्ट्र.

४) श्री. अनंत महादेव भिडे
संकल्प गणेशनगर, पोमेंडी खुर्द,
जिल्हा रत्नागिरी - ४१४ ६३९.

## राजस्थान

१) श्री. विश्वनाथ कृष्णाजी भिडे
३३/१०, चुबे भवन, अजमेर - ३०५ ००८,
(राजस्थान)

## कर्नाटक

1) Shri. Umanath Bhide
Dharmasthala, Belthangady,
Dakshina Kannada, Karnataka-574216

2) Shri. Prafullachandra V. Bhide
C/o. K. Ramesha, Door No. 36,
Kotahalli Koppalu, Gavenhalli,
HASANA, Karnataka-573201.


आमचे ध्येय..
परिपूर्ण औद्योगिक सहाय्य !
NORTON
GRINDWELL NORTON LTD.
GRINDING WHEELS
COATED
DIMOND & CBN
NON-WOVEN (BEAR-TEX)
SAINT-GOBAIN ABRASIVES
TOTEM
FORBS GOKAK LTD.
FORBES RECISION TOOLS
MIRANDA
Fenner
V-BELTS
POLY-F PLUS PB
THE MATCHLESS PERFORMER
LENOX
Bimetal Bandsaw
TAPARIA
Hand Tools
ADDISON
High Speed Steel
METAL CUTTING TOOS
TI
TRUMAX
MACHINE TOOL ACCESSORIES
PIONEER
WHEELS CASTORS & TROLLEYS
भिडे यंत्र लोह वस्तु केंद्र
मुख्य शाखा
730, गणपती पेठ, सांगली. 416 416 फोन : 0233 - 2373220, 2326478 Email : bylvk@dataone.in
कोल्हापूर शाखा
448/बी, पूना-बेंगलोर हायवे, मु. पो. नागाव, 416 122 फोन : 0231 - 2469448/49